॥ ॐ ॥

श्री दिंबरगी महाराजांची

बोध-सुधा

(मराठी अनुवाद)

अनुवादक

श्री. स. श्री. देशपांडे, M. A.

अथणी.

किंमत] १९५८ [८ आणे.

॥ ॐ ॥

श्री निंबरगी महाराजांची

बोध-सुधा

(मराठी अनुवाद)

अनुवादक

श्री. म. श्री. देशपांडे, M. A.

अथणी.

किंमत] १९५८ [८ आणे.

प्रकाशक :

कृ. दा. संगोराम,

वकील–अथणी.

आवृत्ति पहिली – प्रती ५००

मुद्रक :

शा. नी. देशपांडे, M.A.

मॅ. श्रीगणपति सं. प्रेस, सांगली.

अनुक्रमणिका.

पृष्ठें.

प्रार्थना १–२

प्रस्तावना ३–१०६

(भाग १)

आचरणाचीं मूलतत्त्वें : १–१२

१. उत्तम नरदेह; २. जीवाच्या चार स्थितिगति; ३. आचरणाचें बळ व देवाचें बळ; ४. बीजाप्रमाणें पीक; ५. जसा ध्वनि तसा प्रतिध्वनि; ६. पावलोपावलीं आचरणाचें परीक्षण; ७. जसें बोलावें तसें चालावें; ८. तूंच शिव आहेस.

(भाग २) पृष्ठें.

दुर्गुण-त्याग : १३–३१

९. कामिनी, कांचन आणि माती. १०. पर-

स्त्रीच्या संगानें अघोर नरकप्राप्ति. ११. राग हा मत्सर होय. १२. गर्वाचा परिणाम. १३. जळफळणारांना अन्न मिळणार नाहीं. १४. दंभ. १५. कपट वाईट आहे. १६. मोहाचा पाश. १७. अन्यायाचें अनाहूत. १८. पापाला साजेशी शिक्षा. १९. शिक्षेचे तीन प्रकार. २०. चोरून काम नको. २१. आळस हा मुख्य शत्रू होय.२२. चितेचें पीक. २३ निर्गुणाची चिता.

(भाग ३) पृष्ठें.

सद्गुण–संपादन : ३२–६१

२४. विवेक. २५. चांगली बुद्धि. २६. इंद्रियनिग्रह. २७. प्रथम कामास ठार करणें. २८. ओझें घालू नये. २९. हात खाली करू नये. ३०. सहनशीलता. ३१. मनास दुखवू नये. ३२ सत्य–असत्य. ३३. थोरांची सेवा. ३४. आपल्याप्रमाणें इतरांना

लेंखणें. ३५. परोपकार. ३६. दयेचे स्वरूप ३७. देवानें दिलेल्यांत समाधान. ३८ देवानें दिलेला उद्योग. ३९. उद्योग करण्याची रीत. ४०. विवेकानें वागणें. ४१. प्रपंचांत परमार्थ. ४२. परमार्थांत बुडून जावें. ४३. बाह्य युद्धानें दुःखप्राप्तीच (व्हायची). ४४. अंतःशुद्धिनेंच सुखप्राप्ती. ४५. स्वराज्य-संपादन.

(भाग ४)

पृष्ठें.

परमार्थ-मार्ग : ६२-७९

४६. संसारांत सुख नाहीं. ४७. मनाला बोध. ४८. सद्गुरूंची प्राप्ति. ४९. हातानें काम मनानें ध्यान. ५०. संसारांत उदास, परमार्थांत उल्हास. ५१. नेणीव सोडून जाणीवेंत राहणें. ५२. सत्संगाची व्याख्या. ५३. दिवसारात्रीं मिळूनच आत्मध्यान.

५४. देहस्वभाव सोडून साधन करणें. ५५. कल्पनेचा त्याग. ५६. आत्मा माणसाची पारख करतो. ५७. जशास तसें–पेऱ्याप्रमाणें पीक. ५८. आत्म्याची चाकरी हाच मुख्य धर्म. ५९ सर्व कामांत आत्म्यालाच पुढें करावें. ६०. आत्म्याचा साक्षात्कार.

पृष्ठें.

श्री निंबरगी महाराज विरचित पदें ... ८०–९०



श्री सद्गुरुनाथ नारायणराव भाऊसाहेब ऊर्फ
निंबरगी महाराज यांची समाधी, निंबरगी.

॥ ॐ ॥

प्रार्थने

देव ! हिरी गुरुराय ! तिळियदै निन्न माय ।
सेळेयदिरलेन्न मन जगद वैभववु ।
भाव बलियलि ध्यानदलि बेरेयलेन्न मन,
देव दोरलि तन्न दिव्य वैभवव ॥ १ ॥

कुरुळतेयु अळियलै ! सरळतेयु मोळेयलै !
मैयु सवेयलि निन्न सेवेयल्लि !
मतियु होळेयलि नाथ ! कुदुरलेन्नय मातु
कृतियु बेळगलि निन्न बेळकिनल्लि ॥ २ ॥

निन्न नामव मनवु नित्य नेनेयुतलिरलि
अन्य विषयंगळनु बयसदिरलि ।
निन्न नामद सुधेय मनदणिये सवियुतलि
आनन्द-सागरदि मुळुगुतिरलि ॥ ३ ॥

निन्न करुणवे अन्न, निन्न करुणवे नीरु
निन्न करुणवे उसिरु एनगागलि ।
निन्न ओलविन सेल्येयु तोरेदु सुधेयनु सुरिदु
संततेन्ननु पोरेदु बेळेसुतिरलि ॥ ४ ॥

निन्न मितमातुगळु मिचु-मातुगळय्य
संचरिसि बेळकु बल नीडुतिरलि ।
निन्न हिरिनुडिगळवु सिडिलिन कुडियय्य
गुड्डुगि ऐदयि दैन्य दूडुतिरलि ॥ ५ ॥

प्रस्तावना.

भाग १ ला.

श्री. निंबरगी महाराजांचें अल्पचरित्र

श्री निंबरगी महाराज या थोर सत्पुरुषाचा जन्म इसवी सन १७८९ सुमारास लिंगायत जातीतील नीलवाणी या पोटजातीत झाला. त्यांचें आडनांव मिसळकर होतें. त्यांचें जन्मनांव (राशीवरून ठेवलेलें) नारायण किंवा नागाप्पा होते. त्यांचे शिष्य मात्र त्यांना नारायणराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज या नांवानें संबोधित असत. त्यांना गुरुलिंगजंगम महाराज असेही कांहीं लोक म्हणतात; परंतु गुरुलिंगजंगम हें बिरुद त्यांच्या गुरुंचे होतें. त्यांचें घराण्यांतील मूळ पुरुष प्रथम धारवाड जिल्ह्यांतील कुपेनूर या गांवीं

रहात असून त्या गांवची पाटिलकी या घराण्याकडे होती. पुढें या घराण्यांतील सिद्दाप्पा नांवाचा पुरुष कांहीं कारणामुळें कुपेनूर येथून गदग बेटगिरीस जाऊन राहिला. सदर सिद्दाप्पापासुन सातव्या पिढीचे पुरुष लक्ष्मणाप्पा हे महाराजांचे पणजे होत, हे मंगळवेढ्याहून निंबरगीस कायमचे येऊन राहिले. लक्ष्मणापाना डोंगऱ्यापा, नागापा व घोंडापा असें तीन मुलगे होतें. यापैकीं दोघांचीं घरें व वंशज निंबरगी येथें अद्यापि आहेत. यापैकीं वर उल्लेख केलेल्या नागापांचे चिरंजीव भीमण्णा हे श्री निंबरगी महाराजांचे वडील होत. निंबरगी महाराजांचा जन्म सोलापूर येथें आपल्या आजोळी झाला. त्यांचें सर्व आयुष्य निंबरगी येथें गेलें.

श्री निंबरगी महारज शरीरानें उंच, धिप्पाड व खूप सशक्त होते त्यांचा वर्ण गोरा असून कान फार मोठें होतें. खाली दिलेल्या "डोळ्ळीन" पदांतील

वर्णन त्यांना बऱ्याच अंशीं लागू पडतें. त्यांची बुद्धि अत्यंत तीव्र होती.

— पद —

हादिय कूडी होगु अण्ण नम्म —
देवर कंडरे बर हेळो ॥
निम्म देवर खून गुरुता —
नमगे हेळलि बेकल्ल ॥ ५० ॥

केंगरगण्णु वुंगुरमिशी —
नुंगुवंथ बहळवतारा ।
नंगुवंथ वहळबतारा नम्म —
निगन कंडरे बरहेळो ॥ १ ॥
बट्टलमारी भगरी गड्डु —
नेट्टन मूगिन चेलवानु ।
नेट्टन मूगिन चलुव चन्नंग नम्म–
थिट्टन कंडरे बरहेळो ॥ २ ॥

उद्दानवनु उरिसुखदवनु
तिद्दिद होन्न मीशवनो
तिद्दिद होन्न मीशवनो नम्म
रुद्रन कंडरे बरहेळो ॥ ३ ॥

करिय कंबळी वरविन वेत्त नम्म –
गुरुविन कंडरे बर हेळो ।
गुरुविन कंडरे बरहेळो नम्म –
स्वामिन कंडरे बरहेळो ॥ ४ ॥

बालपणीं त्यांना खेळण्याचा फार नाद असे व त्याबद्दल त्यांना आपल्या वडिलाकडून बरेच वेळां रागें भरून घ्यावें लागें. असेंच एकदा वडील त्यांचेवर रागावलें असतां ते त्यांना म्हणाले, "सर्व लोक खेळ खेळतात त्या प्रकारचा माझा खेळ नाहीं. मी एक अगदीं निराळाच खेळ खेळून दाखविणार आहे." आणि खरोखरच एका संतकवीच्या "खेळिया" या

अभंगांत वर्णिलेल्या शुक, नारद, हनुमान व गोपाळ या थोर खेळियाप्रमाणें त्यांनीं परमार्थाचा खेळ उत्कृष्ट रीतीनें खेळून दाखविला.

ते सुमारें २०–२५ वर्षांचे असतांना एकदां शिमग्याच्या सणांत खेळ खेळून फार उशीरा घरीं आले व त्याबद्दल त्यांचे वडील त्यांना फार रागे भरले. त्यामुळें मनास फार वाईट वाटून ते कोणास न कळवितां पंढरपुरांस निघून गेले. तेथें त्यांनीं तीन दिवस उपवास केला. तिसरें दिवशी " तूं सिद्धगिरीस जा म्हणजे तेथें तुझी मनीषा पूर्ण होईल " असा त्यांना दृष्टांत झाला. नंतर ते निंबरगीस परत आले. सिद्धगिरी हें स्थान कोल्हापुराजवळ आहे तेथें ते आपल्या मुलीची जडी काढण्याचे निमित्तानें गेलें. तेथें देवदर्शन घेतल्यानंतर देवळा-नजीकच्या एका गुहेजवळून जात असतां त्या गुहेंत

असणाऱ्या एका वृद्ध साधूनीं त्यांना हातानें आपल्या-कडे येण्याबद्दल खूण केली; परंतु आपणासच बोलावतात कीं आणखी कोणास बोलावतात असा संशय येऊन ते त्या साधूकडे गेले नाहींत. तेव्हां त्या साधूनीं त्यांना दोन्हीं हातांनीं येण्याबद्दल पुन्हा खुणविलें. तें पाहून महाराज फार आतुरतेनें जवळ जवळ उडी मारूनच त्यांचेकडे गेले. त्याच वेळीं त्या साधुपुरुषानें त्या गुहेंत त्यांना उपदेश दिला; व 'मी सांगितल्याप्रमाणें साधन केलेस तर तुझी कीर्ती दिगंत होईल!' असें त्यांना सांगितलें. वरील साधुपुरुष म्हणजे मुप्पिनमुनी असावेत असें सिद्धगिरी व शिरसगी येथील काड-सिद्धांच्या मठांतील कागद-पत्रांवरून दिसतें. या पुस्तकाचे शेवटीं छापलेल्या श्रीनिंबरगी महाराज यांनीं केलेल्या पदांपैकीं क्रमांक (१) या पदांत 'मुप्पिन मुनिय पिडिदु वचन' असा जो उल्लेख आला आहे तो त्यांच्या गुरूंच्या नांवाचा

असण्याचा संभव आहे. अनुग्रह घेऊन निंबरगीस आल्यानंतर सुमारें सहा वर्षेपर्यंत निंबरगी महाराजांचे हातून फारसे साधन झालें नाहीं. सहा वर्षांनंतर त्यांना परमार्थाची आठवण देण्यासाठीं ते वृद्ध साधू निंबरगीस त्यांचेकडे आले. तेव्हां त्यांना महाराजांनीं भोजन घालून चार आणे दक्षिणा दिली. यावर मुनींनी दोन रुपये दक्षिणा मागितली. इतकी दक्षिणा देण्याची महाराजांची स्थिती नव्हती. तरी त्यानीं दोन रुपये दुसरीकडून आणून त्याना दिले. ते दोनही रुपये त्याना परत देऊन ते वृद्ध साधु म्हणाले, यातील एक रुपया तुझ्या प्रपचासाठीं व एक रुपया परमार्थासाठी तू घे ' यावर नाम स्मरण केले असतां प्रपचहि सुखाचा होतो काय ? ' असा महाराजांनीं त्यांना प्रश्न केला. वृद्ध साधूंनीं उत्तर दिलें. " देवाच्या कृपेला काय अशक्य आहे ?" यानंतर महाराज अंतःकरणपूवक साधनास लागले व

वयाच्या ३१ ते ६७ वर्षापर्यंत म्हणजे ३६ वर्षें त्यांनीं प्रपंचांत राहून अविश्रांत साधन केलें. आणि प्रपंच व परमार्थ दोनहि सावली. अशा प्रकारें परमार्थांत अत्युच्च पद मिळविल्यानंतर आपल्या आयुष्यांतील पुढील अठ्ठावीस वर्षें स्वतःच्या नियमित साधनांत खंड पडूं न देतां लोकांनां परमार्थाचा उपदेश करून त्यांचा उद्धार करण्यांत त्यांनीं घालविली.

प्रथम ते निळाऱ्याचा म्हणजे नीळ तयार करून सूत रंगविण्याचा आपला पिढीजाद धंदा करीत असत. परंतु मेंढ्या राखण्याचा धंदा परमार्थ साधण्यास अधिक अनकूल आहे असें पाहून परमार्थासाठीं पुढें ते धगर बनले. आपला शेळ्या मेंढ्याचा कळप व गुराख्यांचीं दोन चार मुलें बरोबर घेऊन ते निंबरगीच्या आसपास पांच सात मैलांतील सातलगांव, जिगजिवणी, कात्राळ, सोनगी, उमदी, जिरंकलगी, बर्डोल, हडलसंग, धुमकनाळ वगैरे

भागांतील कोठल्यातरी धऱ्याखोरी असलेल्या रानांत जात व तेथें शेळयामेंढया चरण्या सोडून त्यांनां संभाळण्याचें काम बरोबरच्या गुराख्याच्या मुलांवर सोपवून ते स्वत: एखाद्या निवांत जागीं संध्याकाळपर्यंत साधन करीत बसत. याप्रमाणें 'जेथें पडली दृष्टि रघुत्तमारायाची" या रामदासांच्या उक्तीप्रमाणें त्यांनीं तो सर्वच प्रदेश पावन करून सोडला. अशा रीतीनें पूर्णपणें परमार्थ साधून ते संसारांतून निराळें झालें. वामपंडितांनी—

"जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी,
म्हणावें कसे ही तयालागी वाणी ॥
परब्रम्हरूपी असा हा तुकावा ।
तयाचे तुकी कोण दूजा तुकावा"

या श्लोकांत तुकाराम महाराज मुळचे वाणी असतां परमार्थ प्राप्तीनंतर वाणी राहिले नाहींत त्याचप्रमाणें

महाराज मुळचे निळाऱ्यांचे निराळे कसे झाले याचे सार्थवर्णण आमचे एका मित्रानीं पुढील सुंदर आर्येत केले आहे.–

" पार्थिव नीळ जयाते 'नीळारें' सार्थ नाम त्या देई ।
परतम नीळ तयातें 'नीराळे' भवभयातुनी नेई ॥ "

श्री निंबरगी महाराजांचे आयुष्य शांतपणें पण दक्षपणें प्रपंच व परमार्थ करण्यांत गेले. त्यांच्या आचरणाच्या बलानें त्यांचा संसार निर्विघ्नपणें पार पडून सुखाचा झाला. त्यांची मुलें नातवंडे वगैरे कोणालाही त्यांच्या हयातींत अपमृत्यु आला नाहीं किंवा कोणी विशेष आजारीहि पडलें नाहींत. आपले आचरण हेंच आपले बळ होय हे तत्व जाणून त्यांनीं आपलें आचरण या पुस्तकांत छापलेल्या त्यांच्या व नावरहुकूम ठेविलें होतें. ते परमार्थांत उल्हसित व प्रपंचात उदास असले तरी त्यांनीं आपल्या प्रपंचाची हयगय न करितां तो खबरदारीनें

व विवेकानें केला. प्रपंचांत वागतांना त्यांनी कोणत्याही दुर्गुणाचा स्पर्श होऊं दिला नाहीं व प्रत्येक सद्गुण आचरणांत आणून दाखविला. पुढें आपली मुलें मोठी झाल्यावर प्रपंच त्यांच्या स्वाधीन करून ते आत्मचितनांत मग्न होऊन राहिले.

बाह्यदृष्टीनें विशेष महत्त्वाच्या अशा घडामोडी श्रीनिंबरगी महाराजांच्या आयुष्यांत झाल्या नसल्यातरी परमार्थाच्या दृष्टीनें उद्बोधक अशा अनेक गोष्टी घडून आल्या त्यापैकीं थोड्या खाली दिल्या आहेत.

(१) एके दिवशीं महारज निंबरगी गांवानजीक असलेल्या, एका विहीरीवर स्नानास गेले होते. विहिरींत उतरणेची वाट फार अरुंद व बिकट असून वाटेच्या दोन्हीं बाजूस निवडुंग वाढला होता. स्नान करून अर्धी वाट चढून आले तों एक मोठा नाग फणा काढून जोरानें वरून खालीं येतांना

दिसला. परत जावें तर खालीं खोल पाणी, बाजूस जावें तर दाट निवडुंग, वर जावें तर समोर फुत्कार करीत आपल्याकडे वेगानें येणारा नाग अशा संकटांत महाराज पडले असतां त्यांनीं डोळे मिटून परमेश्वराचें ध्यान केलें. थोडया वेळानें त्यांनीं डोळें उघडून पाहिले तर नाग निघून गेला होता, हा प्रसंग घडल्याबरोबर नामाचा अगाध महिमा वर्णन करण्याकरितां 'ओम् नाम कायुवद्दु' हे पद त्यांनीं केलें आहे.

(नि. म. प. क्र. २)

(२) कनक या नावाचा वेरड जातीचा एक साधू होता. त्याला साधुत्वाचा अहंकार चढला होता. निंबरगीची पाटलीण व तेथील कांहीं गुरव महाराजांचा द्वेष करीत असत. त्यांनीं कनकाला महाराजांचा छळ करण्यास चिथविलें. कनक महाराजाकडे जाऊन त्यांना म्हणाला, 'तूं आपल्यास

साधू म्हणवून घेतोस, ब्राम्हणाकडून पाया पडून घेतोस तर खरा साधू कोण हें आपण पाहूं. आपण दोघे आपणास या देवळांतील खोलींत कोंडून घेऊं; मग पाहूं की खोलीचे दार न उघडतां तूं बाहेर येतोस कीं मी बाहेर येतो. जो बाहेर येईल तो खरा साधू. महाराजांनीं उत्तर दिलें कीं आपण साधू नाहीं व असले चमत्कार आपणास करतां येत नाहींत, तेव्हां या भानगडीचीं जरूर नाहीं. कनक आपले म्हणणें सोडीत नाहीं हें पाहून पुन: एकदां महाराजांनीं आपण साधू नाहीं वगैरे पूर्वी-प्रमाणे त्यांस सांगितलें त्यामुळें फुशारून जाऊन कनक कोंडून घेण्याबद्दल फारच हट्ट धरून बसला. इतकें झाल्यावर महाराज म्हणाले, 'बरें तर चल,' आपण कोंडून घेऊं व पाहूं कोण बाहेर येतो तें. बाजू अंगावर आली असे पाहून प्रसंग टाळण्यासाठीं कनक म्हणाला, 'आज नको उद्यां कोंडून घेऊं'

महाराजानीं उत्तर दिलें 'अरे उद्याचा काय नेम. उद्याचे कोणी काय पाहिले आहे. चल आताच आपण कोंडून घेऊं. 'नाळे अंदावर मने हाळु' अशी म्हण आहे. या उत्तरानें संतापून जाऊन कनकानें अपशब्द बोलून महाराजांचा फार अपमान केला व तो आपल्या जागीं निघून गेला. तो गेल्यावर भीमराया समोर उभें राहून "हे देवा मी कोणताहि अपराध केला नसतांना हा मला टाकून कां बोलला? तूं आपलें आपलें भक्तरक्षणाचें ब्रीद सांभाळ व योग्य तो न्याय कर" असी महाराजांनीं 'नोयिशी नुडिद न्याकें' (नि. भ. प. क्र. ३) या पदानें देवाची प्रार्थना केली.

त्यावेळीं देवानें आपलें गार्‍हाणें ऐकिलें असा त्यांस प्रत्यय आला. कनक दुसरें दिवशीं गांवास जाणार होता. परंतु त्या दिवशीं रात्रींच त्याला महामारीचा उपद्रव होऊन मध्यरात्रीचें सुमारास तो जगतो कां मरतो अशी त्याची स्थिती होऊन गेली.

श्रीनिंबरगी महाराजांचा छळ केल्यामुळें ही शिक्षा आपल्यास भोगावी लागत आहे, हे कनकाला व त्याच्या जवळच्या मंडळीना कळून चुकलें व त्यास क्षमा करावी अशी विनंती करण्यास त्याचे शिष्य महाराजाकडे आले. तेव्हां त्याला त्याच्या वाहनावर (!) बसवून त्याला दक्षिणेकडे निंबरगी गांवाच्या सीमेबाहेर तुम्ही न्याल तर तो वाचेल असें महाराज म्हणालें त्याप्रमाणें केल्यावर तो वांचला.

(३) महाराज निंबरगी येथील भीमरायाचें देवळांत बिळेंन सिद्धाच्या ओवरींत बसून दासबोधावर निरूपण करीत असत भीमबाई या नांवाची त्यांची एक शिष्यीण लगतच्या ओवरींत रहात असे. एकदां तिच्या पाटल्या चोरीस गेल्या. तेव्हां फौजदाराच्या हुद्यावर असलेल्या गुंडोपंत या नांवाच्या आपल्या भावास तिनें चोरीच्या तपासासाठीं निंबरगीस बोलावून घेतले. 'तुझा कोणावर वहीम आहे काय ?' असे त्यानें तिला विचारतां माझा कोणावर

वहीम नाहीं पण हा म्हातारा माझ्या खोली जवळच्या ओवरींत पुराण सांगणेंस येत असतो. त्यानें माझ्या पाटल्या कदाचित घेतल्या असल्या तर असतील ' असें तिनें उत्तर दिलें. फौजदारानें ही गोष्ट नम्रपणें महाराजांना कळवून त्यांना चावडीवर बोलाविलें व तेथें त्यांना बसवून ठेविलें. महाराज अंतरीची खूण समजून हसूं लागले. थोड्या वेळानें त्याना बरोबर घेऊन झडती घेण्यासाठीं फौजदार त्यांचे घरीं गेला. महाराजांचे चिरंजीव भीमण्णा हेच त्या वेळीं घरची सर्व व्यवस्था पहात असल्यानें तेहि तेथें होते. झडती घेण्यासाठीं त्यांच्या माजघरांतील खोलींत गेलेवेळीं फौजदाराला तेथें चोरीस गेलेल्या पाटल्या तर दिसल्या नाहींतच पण जमिनीवर सोन्या रुप्याचे अनेक इतर दागिनें व रुपयांचे व इतर नाण्यांचे ढीग पडलेले त्यांच्या नजरेस आले. इतकी संपत्ती ज्यांच्या घरांत आहे तो क्षुद्र पाटल्याची

चोरी करणार नाहीं, त्यांच्यावर वहीम घेण्यांत आपण चूक केली असा त्याला पश्चाताप झाला व त्यानें महाराजांची क्षमा मागितली. झाल्या गोष्टी-बद्दल राग अगर उद्वेग मुळीच न दाखवितां महाराजानीं उलट फौजदाराचेच आभार मानिले व ते म्हणाले 'तुमच्यामुळें आज माझ्या मुलाची श्रीमंती मला पहावयास मिळाली हे तुमचेच मजवर उपकार आहेत. प्रपंचाचा सर्व भार मुलावर टाकून महाराजानीं आपणास केवळ परमार्थास वाहून घेतल्यामुळें आपल्या मुलांची संपत्ती खरोखरीच त्यांना माहीत नव्हती.

(४) एकदां नित्याप्रमाणें महाराज आपल्या शिष्यांना निंबरगीच्या देवळांत पालखीच्या ओवरींत बसून पोथी सांगत होते. पोथी संपल्यावर त्यांचे शिष्य नेहमींच्या पद्धतीनुसार नारळावर कापूर लावून त्यांच्यापुढें आरती करीत होते. हे पाहून

मागे क्रमांक २ च्या गोष्टीत उल्लेखिलेल्या पाटलिणीला फार संताप आला व ती महाराजांना म्हणाली ' ए मुदभारगे (थेरड्या केरसुणे) समोर प्रत्यक्ष देव भीमरायाची मूर्ती असतांना त्याला सोडून लोक तुझ्या पुढेच नारळ ठेवितात व आरती करितात त्याची तुला लाज वाटत नाहीं ? ' इतके बोलून तिनें कापरासकट नारळ लाथाडून दिला. हें पाहून महाराजांना फार वाईट वाटले. ते पाटलिणीला म्हणाले ' आजपर्यंत तू माझ्या शरीराचा अपमान केलास तो मी सहन केला पण आज तू देवाचा अपमान केला आहेस. बरे असो. मला मुदभारगी म्हणतीस काय ? ' ए हुरट भारगे इन्न इ मुदभारगी कै नोड. ' (ए पोरकट केरसुणे ! आतां ही थेरडी केरसुणी कसा हात दाखविते ते पहा.) यानंतर थोडे दिवसांनीं पाटलिणीचा पाटिलकीसंबंधीं जो दावा ती

व तिच्या पुतण्या मलकापा यांचे दरम्यान कित्येक दिवस चालला होता त्याचा निकाल तिच्या उलट होऊन तिची पाटिलकी कायमची गेली व ती तिचा पुतण्या मलकापास मिळाली. पुढें पुढें तर पाटलिणीला फारच दु:स्थिति आली हें त्या गांवांतील लोकांस माहीत आहेच. पुढें सन १९२२ सालीं सांप्रदायांतील कांहीं थोर मंडळीं निंबर्गीस यात्रेच्या निमित्तानें गेली होती. सदर पाटलिणीस भेटणेस गेलेवेळीं ती त्याना म्हणाली ' अजून तो म्हातारा (निंबरगी महाराज) मला किती छळतो आहे पहा. '

श्रीनिंबरगी महाराजांचा सर्व काळ आत्मचिंतनांत व शिष्यांना परमार्थाचा उपदेश करण्यांत जात असे. त्यांनीं परमार्थ अत्यंत गुप्त ठेविला होता. आपले अगदी जवळचे स्नेही अगर आप्त यानाहि कळूं न देतां ते अत्यंत गुप्तपणें साधन

करीत. ' फळ पानाआड राहिलें तरच तें वाढून पिकतें नाहींतर पक्षी त्याला टोचे मारतात किंवा कच्चे असतानांच लोक ते तोडून नेतात. ' याप्रमाणें प्रकटपणें नेम केल्यास दंभ व अहंकार शिरणेचा संभव असतो. जिज्ञासु, उपदेश देण्याला अनुग्रह देत नसत. एकदां अनुग्रह दिला कीं शिष्याची सर्व जबाबदारी आपणावर घ्यावी लागते हें ते जाणून होतें. त्यांच्या कृपेमुळें कित्येक शिष्य घोर संकटांतून व दुर्धर व्याधींतून मुक्त झाल्याची उदाहरणें घडली आहेत. त्यांनीं आपला मार्ग गुप्त ठेविल्यामुळें त्यांचा शिष्यवृंद परिमित होता. त्यामुळें त्यापैकीं बरेच लोक परमार्थाच्या उच्च पदवीला पोचलें होते.

अशा रीतीनें प्रपंच व परमार्थ यात विरोध नाहीं. ईश्वराची भक्ति केल्यानें अभ्युदय व निश्रेयस् या दोन्हींची प्राप्ती होते. म्हणजे प्रपंचही सुखाचा होतो व आत्म प्राप्तीहि होते हे आपल्या उदाहरणानें

सर्वांस दाखवून इ. स. १८८५ मध्यें चैत्र शुद्ध १२ उपरांतीक १३ स. रात्रीं बारा वाजणेच्या सुमारास आपल्या वयाच्या ९५ व्या वर्षी निंवरगी येथें त्यानीं देह ठेविला.

महाराजांची समाधी प्रथम ओढ्या पलीकडे गुरवाच्या मालकीच्या जमिनींत करण्यांत आली होती. मलकापाकडे पाटिलकीं असेतोपर्यंत म्हणजे सन १९०० इसवी पर्यंत जवळ जवळ १६ वर्षे तेथें भक्ति व्यवस्थितपणें चालली होती. पुढें मलकापा वारला. त्यानंतर गुरवाशीं संगनमत करून मागें सांगितलेल्या पाटलिणीनें महाराजांचें समाधीवर बांध घालून ती बुजवून टाकली व ती कोणांस तेथें उत्सव करूं देईना. भक्तीमध्यें हें मोठे विघ्न आले. पुढें दोन वर्षांनीं निंबरगी महाराजांचे शिष्य श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांनीं इ. स. १९०३ सालीं निंबरगीपासून ९-१० मैलावर असलेल्या

इंचगेरी गांवीं महाराजांच्या नवीन पादुका स्थापन करुन तेथें उत्सव सुरु केला. पुढें निंबरगीसही सन १९१० सालीं श्री निंबरगी महाराजांच्या अस्थी मूळ जागेतून हालवून ओढ्याचें अलीकडे सध्याचें जागेंत त्याच्या शिष्यवृन्दानीं त्यांच्या नातवाकडून त्यांच्या समाधीची स्थापना करविली. या समाधीवर सन १९२६-२७ सालीं लहानच पण सुंदर देऊळ बांधण्यांत आले. सन १९२९ च्या चैत्रमासीं महाराजांच्या समाधीवर लिंगाची स्थापना करण्यांत आली व पुढें सन १९३६ सालीं देवळापुढें असलेल्या जोत्यावर तीन शोभिवंत कमानीं बांधणेंत आल्या. आणि सन १९४६ सालीं त्यापुढें एक साधाच पण प्रशस्त असा सभामंडप बांधणेंत आला. हें सुंदर व रमणीय स्थान भक्तीला अत्यंत योग्य व उपयुक्त झालें आहे. तेथें चैत्र शुद्ध ९ मी पासून १३ पर्यंत दरवर्षी निंबरगी महाराजांचे पुण्यतिथी निमित्त सप्ताह व उत्सव होत असतो.



श्री साधु महाराजांचें मंदिर, चिमड.

भाग २ रा.

श्री निंबरगी महाराजांचे कांहीं प्रमुख शिष्य.

१ श्री रघुनाथप्रिय ऊर्फ साधुबुवा.

श्री रघुनाथप्रिय हे निंबरगी महाराजांचे प्रमुख शिष्य होत. यानाच साधुबुवा असे म्हणत. त्यांचा जन्म आंध्र प्रांतांत एका श्रीमंत घराण्यांत झाला होता. परंतु बालवयातच ते वैरागी होऊन बाहेर पडले. त्यांनीं हिंदुस्थानभर यात्रा केल्या. या तीर्थपर्यटणांत ते एकदां निंबरगी जवळील सोनगी या नावच्या खेड्यांत येऊन राहिले व तेथें त्यांनीं एका देवालयांत वस्ती केली. ते लंगोटी नेसून वर भगवी कफनी घालीत असत. सोनगीस असतांना सिद्धीच्या सामर्थ्यानें ते लोकांचे रोग बरे करीत व पुष्कळ अन्नसंतर्पणहि करीत. त्यांना वाचासिद्धी

होती असे म्हणतात. यामुळें त्यांची आसपास फार प्रसिद्धि झाली. सगुण भक्ति, व्रते, अनुष्ठानें व अन्नसंतर्पण करणें हाच परमार्थ होय अशी त्यांची समजूत होती. श्री निंबरगी महराजांचे चिरंजीव भीमण्णा, जिगजिवणीचे कुलकर्णी बापूरावदादा, निंबरगी येथील लक्ष्मीबाई आक्का व आत्मारामबुवा जैन वगैरे त्यांच्या शिष्य मंडळीनीं श्री महाराजांचे जवळ सदर साधुबुवाना जाऊन पाहणेचा एकदां आग्रह धरिल्यावरून श्रीनिंबरगी महाराज वरील मंडळी समवेत साधूबुवांचे भेटीस सोनगीस गेले. महाराजांची योग्यता माहीत नसल्यामुळें साधुबुवानीं त्यांना विशेष आदरहि दाखविला नाहीं. " आपण अन्नसंतर्पण, अनुष्ठाने वगैरे कशासाठीं करिता ? असा महाराजांनीं त्याना प्रश्न केला. तेव्हां साधुबुवांनीं त्यांना उत्तर दिले. हा पुण्यमार्ग आहे म्हणून मी या गोष्टी करतो. यावर' हा पुण्यमार्ग

कशावरून? ' पुण्य तुमच्या डोळ्याला दिसते का ? असे तुमचे पुण्य किती साठलें आहे ? " असें महाराजानीं विचारलें. त्याचे उत्तर साधूबुवांना देता आलें नाहीं. परंतु या प्रश्नानें त्यांचे अंतःकरणास चटका लागून राहिला. निंबरगी महाराज हे आहेत तरी कोण हे त्यांच्या बरोबरच्या माणसांकडून समजून घ्यावें या उद्देशानें आपल्या बरोबरच्या मंडळींना आज सायंकाळीं आपण येथे ठेऊन जावे " अशी त्यांनीं महाराजांना विनंती केली. त्यांची ती विनंती मान्य करून महाराजानी बरोबरच्या मंडळीना तेथे राहणेस सांगितलें व आपण परत निंबरगीस गेले. या चौघाकडून मिळालेल्या माहिती वरून श्रीनिंबर्गी महाराज व त्यांचे परमार्थसाधन याबद्दल साधुबुवांचे मनांत उत्कट कुतूहल उत्पन्न झालें व महाराजांचा जीवनक्रम प्रत्यक्ष पाहणेचा त्यांनीं निश्चय केला.

महाराज मेंढयांचा कळप घेऊन रानांत जातात व तेथें साधन करतात. हे त्याना कळलेच होते. एके दिवशीं पहाटेस ते महाराज ज्या भागांत साधनास त्यावेळीं जात असत त्या भागांत गेले. महाराज नित्याप्रमाणें सकाळीं साधनांस जाऊन बसल्यावर साधुबुवाहि जवळच असलेल्या एका लिंबाच्या झाडावर जाऊन बसले. महाराज संध्याकाळ-पर्यंत उठले नाहींत; त्यामुळें साधुबुवानाहि तोपर्यंत झाडावरच बसून राहावें लागलें. महाराज उठून घरीं जावयास निघालें तेव्हां झाडावरून खालीं उतरून साधुबुवांनीं त्याना नमस्कार केला, तुम्हीं इतका वेळ कोठें होता ? असे महाराजांनीं विचारतां 'मी झाडावर बसून होतो' असे साधुबुवांनीं उत्तर दिलें. महाराज म्हणाले 'आतापर्यंत उपाशीच होता काय ?' यावर आपण लिंबाचा पाला खाल्ला व लिंबाचा

पाला खाऊन राहणेंची संवय आहे' असें साधुबुवांनीं उत्तर दिलें. महाराज हसून म्हणाले 'लिंबाचा पाला खाऊन देव मिळत असता तर प्रथम तो उंटांस मिळाला असता' हे ऐकून अगोदरच मृदु झालेलें साधुबुवांचें अंतःकरण अधिकच मृदु होऊन त्यांनीं महाराजांचे चरणीं मस्तक ठेवून 'आपण उद्धार करावा' अशी सद्‌गदित प्रार्थना केली. त्यांची योग्यता जाणून महाराजांनीं त्यांचेवर अनुग्रह केला. कांहीं दिवस निंबरगीस राहून पुढें गुरूंच्या आज्ञेनें ते उमदीस गेले. तेथें ते बाळवा बगली यांचे घरीं अगर मारुतीच्या देवळाचे ओवरींत रहात असत. अशा रीतीनें त्यानीं बारा वर्षे तेथें साधन केलें. शरीर कष्टवून कडक साधन करून त्यांनीं परमार्थांत फार उच्च स्थान मिळविलें व नंतर गुरूंनीं आज्ञा केल्यावरून परमार्थाचा प्रसारहि केला. त्यांची गुरूभक्ति अतीशय उत्कट होती. निंबरगीस

महाराजांचे भेटीस जात असताना गावच्या वेशीपाशी आल्यावर ' राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ' अशी मोठ्यानें ते गर्जना करीत व महाराजांचे घराजवळ गेल्यावर तसाच जय जयकार पुनः करून बराच कापूर महाराजांचे घराचे आंत कट्यावर लावीत. तेव्हां महाराज त्यांनां म्हणत ' बाबा, इतका वडेजाव करूं नयें, जय जयकार हळू करावा व थोडा कापूर लावावा. तुझे कापराचे जाळानें माझे गरीबांचे घर पेटेल. पुष्कळ कापूर लावून जर देव मिळत असता तर श्रीमंत लोक खंडेवारी कापूर लावतील.

साधुबुवा आपल्या परमार्थाच्या फेरीत, व्रिटे, विजापूर, तिकोटे, जमखंडी चिमड, वगैरे गांवी जात असत. असेच ते एकदा चिमडास गेले असता ते आजारी पडले व त्यांच्या प्रकृतीची काळजी वाटूं लागली तेव्हां ' आपण आणखी कांहीं दिवस राहावें.

श्रीसद्गुरु भाऊराव महाराज उमदीकर.



जन्म–उमदी
शके १७६५ रामनवमी.

समाधी–हिंचगेरी.
शके १८३५ माघ शु. ३ गु

आपल्या भक्ताना सोडून जाऊ नये. आपण गेलांत तर भक्तीचा आधार जाईल. ' अशी त्यांच्या शिष्य-मंडळीनी आग्रहानें त्यांची प्रार्थना केली. शिष्यांच्या इच्छेप्रमाणें ते पुढें आणखी एक वर्ष राहिले. पुढील वर्षी पुन: चिमडास गेल्यावर तेथेंच त्यांनीं आपला देह ठेविला. चिमडास त्यांचे नावांनें त्यांचे शिष्य रामभाऊ महाराज यरगट्टीकर यानीं विहीरीमध्यें देऊळ बांधले आहे.

२ श्री उमदीकर महाराज

साधुमहाराज अजमासें बारावर्षें उमदीस राहिले होते हे वर सांगितलेंच आहे. तेथें देशपांड्यांचें मोठें घराणें आहे. त्यातील नानासाहेब व दाजीबा या दोन बंधूनीं श्री निंबरगी महाराजापासून अनुग्रह घेतला होता व त्यांची गुरूंवर फार निष्ठा होती. नानासाहेब हे स्वभावानें गंभीर व दूरदृष्टीचें

असून दाजीबा यांचा स्वभाव भोळा होता. त्यांचे धाकटे बंधू भाऊसाहेब यांची आपल्या वडील बंधूंच्या निर्गुण उपासनेवर श्रद्धा नव्हती. ते स्वत: सगुणोपासक असून, ते उमदी या मारुतीची रोज नेमानें पूजा करीत असत. साधूबुवा मारुतीच्या देवळाच्या ओवरींत असतांना ते भाऊरावांना त्यांच्या सगुण भक्तीबद्दल धन्यवाद देत व "भाऊराया, काय तूं पुण्यवान काय तुझी भक्ती श्रेष्ठ" असे म्हणून त्यांच्या पायाहि पडत. यामुळें भाऊसाहेबांचें मन त्यांचेकडे सहजच ओढले गेलें. व पुढें 'पडी घेऊनि उलथावें" या वचनाप्रमाणें त्यांनीं भाऊसाहेबांचें अंत:करण खऱ्या परमार्थाकडे वळवून त्यांस त्यांनीं निंबरगी महाराजाकडे नेलें. महाराजांनीं त्यांना साधूबुवा करवीच नाम देवविलें. "साधू-बुवानी माझ्या पाया पडून मला खऱ्या परमार्थ मार्गास लाविलें." असे भाऊसाहेब पुढें

डोळ्यांत अश्रू आणून सांगत. भाऊसाहेबांना त्यांच्या वयाच्या बेचाळिसाव्या वर्षापर्यंत गुरुकृपा व गुरूंचे सानिध्य लाभलें. या काळांत आप्तेष्टांच्या निंदेस न जुमानतां देह कष्टवून त्यांनीं फार खडतर साधन केलें. ते अत्यंत निस्पृह, नेमस्त व मनोनिग्रही असून त्यांची गुरुभक्ती निःसीम होती. परमार्थातील अत्युच्च पदवी प्राप्त करून घेऊन त्यांनीं गुरूंच्या आज्ञेनुरुप परमार्थाचा प्रसार केला. त्यांनीं इ. स. १९०३ सालीं इंचगेरीस आपल्या गुरुंचे नांवानें देऊळ बांधिलें हे वर सांगितलेच आहे.

३. श्री रामभाऊ महाराज यरगट्टीकर, चिम्मड.

हे यरगट्टीचे राहणारे. ते प्रथम विटे, मायणी येथें कोर्टांत नोकरीस होते. पुढें त्यांनीं जत येथें नोकरी धरली. उमदी हे गांव जत संस्थानांत आहे.

तेथें रामभाऊ यांना आपल्या नोकरीच्या कामा-निमित्त जावें लागे. तेव्हां ते तेथील देशपांडे यांचें घरीं उतरत. तिघेही देशपांडे बंधू श्रीनिंबरगी महाराजांचे संप्रदायांत होते हें मागे सांगितलेंच आहे. त्यांचेमुळें रामभाऊची व साधूबुवांची गांठ पडून त्यांचे मनांत परमार्थाविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली. पुढें साधूबुवा त्यांना श्रीनिंबरगी महाराजांकडे घेऊन गेले व महाराजांनीं त्यांना साधूबुवा करवीं उपदेश देवविला. उपदेश मिळाल्या-वर कित्येक वर्षें त्यांनीं निष्ठापूर्वक साधन केलें, व दरवर्षी पौषमासीं निंबरगीस गुरूंच्या दर्शनास जाणेची त्यांनीं वारीहि धरिला व ती त्यांनीं श्रीमहाराज हयात असेतोपर्यंत चालविली. साधूबुवांनीं चिमडास देह ठेविल्यावर रामभाऊ महाराज हे चिमडास जाऊन राहिले व तेथें त्यांनीं साधुबुवांचे नांवानें एक देऊळ बांधले, व गुरूंचे आज्ञेनें बरीच वर्षें परमार्थाचा प्रसारहि केला.

४ भाऊरावकाका सावळसंगकर.

हे सावळसंगचे राहणारे. ते शरिरानें भव्य व अजानुबाहू होत. त्यांचा आवाज पहाडी पण मधूर असून ते पदें फार चांगली म्हणत. "सगुणरुप नयनीं, नयनीं आधि दावा" व " कालुकर्मनु कालिले ओद्दि- दाव कत्तलिगंजुवने " ही आपलीं आवडती पदें तें निंबरगी भीमरायाच्या देवळांत म्हणूं लागले म्हणजे तेथून दोन फर्लांगावर असलेल्या निंबरगी गांवांत ती सहज ऐकू जात असत. गुरूंच्या ठिकाणीं त्यांची दृढ भक्ति असून त्यांची पारमार्थिक योग्यताहि मोठी होती. त्यांची समाधि तिकोटे येथें आहे.

५ विरक्तापा उमदी.

हे एक महाराजांचे चांगल्यापैकीं शिष्य होते. निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव चैत्रमासीं निंबरगीस होत असे. तेथपर्यंत सदर उत्सवास येणेस

ते केव्हांही चुकले नाहींत. त्यांनीं इंचगेरी जवळ कन्नूर येथें देह ठेविला. तेथेंच त्यांची समाधी असून त्यांच्या शिष्यांनीं तेथें एक मठहि बांधला आहे.

६ बापूराव दादा जिगजिवणी.

हे मूळ जिगजिवणीचे राहणारे असून तेथील कुलकर्णी होते. श्रीनिंबरगी महाराजांचा अनुग्रह झालेवर त्यांनीं कुटुंबासह निंबरगीस महाराजांचे सान्निध्यांत वस्ती केली. तेथें कित्येक वर्षे ते निंबरगी महाराजांचे जवळ दासबोध वाचीत व श्री निंबरगी महाराज त्याचा अर्थ सांगत असून त्यांचेच पुतणे श्री अंबुरावबाबा हे लहानपणीं त्यांचे जवळ शिक्षणाकरितां राहिले असतांना त्यांनीं श्री निंबरगी महाराजांना पाहिले होते. त्यावेळीं शाळेतून परत येतांना केव्हां केव्हां महाराजाकडून त्याना कांबळ्याच्या गाठींत बांधलेला साखरेचा प्रसाद मिळे म्हणून ते त्याना सक्रीमुत्या असे म्हणत

असत. पुढें श्री अंबुरावबाबाना उमदीकर महाराज यांनीं सावळसंग काकाकडून अनुग्रह देवविला व त्यांच्याच मदतीनें इंचगेरी येथें मठाची स्थापना करून परमार्थ वाढविला.

७ मलकापा माशाळ

हे उमदीचे रहिवाशी असोन महाराजांचे ते एक फार भाविक व एकनिष्ठ शिष्य होते. त्यांनीं कित्येक वर्षें उमदीस श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचे बरोबर घरांत व डोंगरांत साधन केलें व त्यांचे बरोबर चिमडाला दरसाल जाणेचाहि त्यांचा परिपाठ असे.

८ गुरुलिंगापा आवटी

हे उमदीचे राहणारे. महाराजांचे ते एक निष्ठावंत व कर्तव्यदक्ष शिष्य होते. निंबरगी येथील चैत्र व मार्गशीर्ष महिन्यांतील उत्सवांत कोठीची

व्यवस्था त्यांचेकडे असे व ती ते चोखरीतीं
पार पाडीत.

९ दाजीबा पाटील सातळगांव

हे एक महाराजांचे करारी व हट्टी शिष्य होते. श्री महाराज दररोज भीमरायाचे देवळात पोथं सांगत हे वर सांगितलेच आहे. अशाच एका प्रसंगी देवळाच्या नगारखान्यांत एकदां सकाळीं पोथं चालली असतां दाजीबा पाटील तेथें हजर होते. त्यावेळीं कांहीं प्रसंगानुसार श्री महाराज म्हणाले ' परमेश्वराचे ध्यान केलें असतां तो भक्तांचा योगक्षेम सर्वप्रकारे चालवितो. ' या वचनाची सत्यता पाहणेंचे दाजीबानें ते महाराजाना म्हणाले, ' परमेश्वराचे ध्यान केले असतां जर तो भक्तांचा योगक्षेम चालवितो तर आपण व मी दोघेही येथेंच नेमाने बसूंया व देव आमच्या पोटास घालतो किंवा कसें ते पाहूं. ' ' बाबा, असा हट्ट धरून परिक्षा पाहूं नये. '

असे सांगून त्यांची समजूत करणेंचा प्रयत्न केला पण ते ऐकेनांत. तेव्हां बरे तर आपण दोघेहि येथें नेमास बसूं व काय होते ते पाहूं. " असे महाराज त्यांना म्हणाले. त्याप्रमाणें पोथी संपलेवर दोघेहि तेथेंच नेमास बसले. तीन प्रहर जाहले व ' महाराज, तुमचा देव कोठे आहे ? तो अद्याप आमचे पोटास कां देत नाहीं ? " असे म्हणूं लागले. तेव्हां धीर धरून तसेच नामस्मरण करीत बसण्यास महाराजानी त्यांस सांगितले. आणखी दोन अडीच तास गेल्यावर दाजिबास मुळींच धीर निघेना. पण महाराज तेथे बसले असल्यामुळें तेथून उठण्याची सोय नव्हती. इतक्यांत सोलापूरचे कांहीं व्यापारी महाराजांचे दर्शन घेण्याच्या इच्छेने निंबरगीस आले होते. ते त्यांचे घरीं गेले पण महाराज त्या दिवशीं जेवणासहि घरी आले नसून देवळांतच असल्याचे समजल्यावरून त्यांनीं पाण्याकरितां एक घागर

मागून घेतली व वाटेंत ती ओढयाचे पाण्यानें भरू घेऊन ते देवळांत गेले, व त्यांनीं नगारखान्यां जाऊन पेढे, वर्फी, आंबे, फुलांचा हार वगैरे बरोब आणलेले पदार्थ व पाणी महाराजांचे पुढें ठेवू त्याना नमस्कार केला. महाराज हसून म्हणाले " माझ्यापुढे कशास ठेविता ? हा दाजिबा येथे बसला आहे त्याचे पुढें ठेवा.' याप्रमाणें दाजिबा महाराजांच्या वचनाची सत्यता पटल्यानें फा आनंद झाला.

१० नरसापा शापेरी विजापूर

हे जातीचे मालगार असून त्यांनीं श्री निंवरगी महाराजांनी आपला 'कडेहुट्ट मगा' अ म्हटलें होते. वयाला ८५ वर्षें होईपर्यं त्यानीं गवंड्याचा धंदा केला व त्यातून सवड करून ते निंवरगीस गुरुंच्या समाधी

श्री नरसप्पा शापेटी, विजापूर.

दर्शन घेण्यासाठीं जात. पंचाऐंशी उलटल्यावर काम होईनासे झाल्यामुळें व घरीं कोणी बायकामुलेंहि नसल्यामुळें त्यांनीं भिक्षावृत्ति पत्करली. एका घरीं एका चतकोरापेक्षां अधिक भाकरी ते घेत नसत, व कोणी पैसे दिलें तर एका दिडकीपेक्षां जास्त घेत नसत. याप्रमाणें अकरा रुपये जमले म्हणजे ते विजापुराहून निंबरगीस पायी जाऊन तेथें महाराजांचे समाधीस नैवेद्य करून तेथील पारमार्थिक मंडळीस प्रसाद भोजन करीत असत. हा त्यांचा क्रम अनेक वर्षे चालूं होता. त्यांनीं आपल्या १०५ वर्षांच्या दीर्घायुष्यांत आपल्या गुरूंची अत्यंत एकनिष्ठपणें भक्ति केली व परमार्थ साधून जन्माचें सार्थक केलें. 'विठ्ठला, शिवशिवा, गुरुलिंग जंगम महाराज की जय', 'अगाध हो, सद्गुरु महिमा अगाध हो' असा जयजयकार घोष ते वरचेवर मोठ्यानें करीत' वयाच्या ९८ व्या वर्षी घेतलेला त्यांचा फोटो या

पुस्तकांत दिला आहे. त्यांची समाधी निंबाळ नजीक मसळी येथें आहे. त्यांची मुलगी मसळी येथें दिलेली असल्यानें तिकडे जातांना निंबाळास ते वरचेवर येत असत.

११ पंढरीनाथ देसाई.

हे जिगजीवणीचें राहणारे. हे धिप्पाड व सशक्त असून एक भक्तिमान व कर्तृत्ववान शिष्य होते. दर शनिवारीं भीमरायाचे व सद्गुरूंचें दर्शनास ते निंबरगीस जात असत. महाराजांचें देवदर्शनापूर्वी निंबरगीच्या पाटिलकीबद्दल पाटलीण व तिचा पुतण्या मलकाप्पा यांचे दरम्यान चाललेल्या दाव्यांत मलकाप्पाचे वतीनें त्यांनींच पुढाकार घेतला होता. हे शेवटच्या दुखण्यानें आजारी झालें. तेव्हां उमदीचे महाराज चिम्मडास जाणेंकरितां निघाले असतां त्यांना हे वर्तमान समजलें तेव्हां ते विजापुरा-

पुर्यंत गेलेले परत त्यांना भेटणेंसाठीं जिगजीवणीस गेले व त्या वर्षी ते चिम्मडास गेले नाहींत.

१२ निंबाळचें भाऊराव नाडगौडा यांच्या मातोश्री या एक फार भाविक शिष्या असून त्यांची प्रचीतिही उच्च दर्जाची होती.

१३ लायपा ककमरी, १४,१५ हवन्याळचे गुरबसाप्पा कोष्टी व पेरू (मांग), १६ निंबर्गीचे मोईनसाहेब व १७ अंबोजी धनगर हे सर्व शिष्य महाराजांचे प्रेमळ भक्त असोन एकनिष्ठ सेवक होते. महाराजांच्या शिष्यवर्गात कोणत्याहि जातीच्या अगर धर्माच्या मनुष्याला मज्जाव नसे. पेरु मादर आपल्या सात मुलांना घेऊन निंबरगी येथें महाराजांचे पुण्यतिथीचे उत्सवाचेंवेळीं शिंग, हलगे, सनया वगैरे वाद्ये वाजविणेंचें काम न चुकता करीत असे. त्यांचे वंशजानीही इंचगेरी, उमदी व

निंबरगी येथें उत्सवाचेंवेळीं हीच सेवा करण्याचें आपल्या वडिलांचे व्रत चालविलें.

१८ रघुनाथाचार्य आद्य

यांचा जन्म आगरखेड येथील प्रसिद्ध 'आद्य' घराण्यांत झाला. ते नानासाहेब देशपांडे उमदीकर यांचें जावई होत. ते श्री निंबरगी महाराजांच्या पट्टशिष्यापैकीं असून निंबरगी येथील भीमरायाच्या देवळांतील भीमाबाईच्या ओवरीलगत असलेल्या आपल्या ओवरींत आपल्या बहिणीसकट रहात असत. महाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या समाधीची पूजाअर्चा त्यांनीं एनिष्ठपणें आमरण चालविली. आपले अगरखेड येथील घरदार, शेतभात सर्व कांहीं मी देतो, निंबरगीच्या महाराजांची समाधी ज्या थोडचा जागेवर आहे ती जागा तेवढी मला द्या असें त्या जमिनीचें मालक निंबरगी येथील

गुरव यांना ते म्हणत असत. पण ती जागा गुरवांनीं त्यांना दिली नाहीं. त्यांची निस्सीम भक्ति पाहून " तुला महाराजापुढें मी नंदी करून बसवितो " असें श्रीउमदीकर महाराज त्यांना म्हणाले होते.

यानींच प्रथम श्रीनिंबरगी महाराजांच्या वचनांची रचना करून ती पोथीच्या रूपानें देवनागरी लिपीत लिहून काढली. त्याचप्रमाणें संतांनीं केलेली असंख्य मराठी, कानडी व हिंदी पदेंहि त्यांनीं लिहून काढलीं आहेत. त्या पदसंग्रहापैकीं बराच भाग अद्याप उपलब्ध असून तीं पदें साधकांना फार उपयोगी पडण्याजोगीं आहेत. त्यांची महाराजांच्या वचनांची पोथी हा बोधसुधेचा मूळ पाया होय. या पोथीची रचना हें त्यांचें परमार्थांतील मुख्य काम होय. महाराजांच्या वचनांचें रक्षण करून व तीं लोकांना प्राप्त करून देऊन त्यांनीं साधक मंडळीवर फार

उपकार केले आहेत. त्यांचें अक्षर फार सुंदर होतें. कोणी परमार्थप्रेमी साधकानें अगर जिज्ञासूनें कांहीं पदें अगर वचनें त्यांचेकडे मागितली तर ते तात्काळ त्यांना लिहून देत. याप्रमाणें आपल्या पोथीच्या हस्त-प्रती त्यांनीं बऱ्याच परमार्थप्रेमी साधकांना दिल्या होत्या.

१९ श्री बाबाचार्य काव्य.

हे एक निष्ठावंत व भक्तिमान शिष्य होते. ते कानडी भाषेंत निष्णात असून संस्कृत व हिंदी या भाषाहि त्यांना अवगत होत्या. ते मराठी भाषाहि जाणत होते. श्री निंबरगी महाराजांच्या वचनांची रघुनाथाचार्यांनीं लिहीलेली पोथी घेऊन तींत मराठी, कानडी व हिंदी संतांचीं अवतरणें घालून त्यानी 'महाराजरवर वचन' हें पुस्तक १९०८ साली देवनागरीं लिपीत छापून विजापूर येथे प्रसिद्ध

केले. या पुस्तकाच्या शेवटीं श्री निंबरगी महाराजांनीं केलेलीं पदेंहि दिली आहेत. या पुस्तकाच्या प्रकाशनामुळें महराजांच्या वचनांतील उपदेशामृताचा लाभ फार लोकांनां मिळूं शकला. बाबाचार्यांनीं या आपल्या कार्यानें परमार्थ प्रेमी लोक व विशेषतः श्री निंबरगी महाराजांच्या संप्रदायातील साधक वर्ग यास कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

हिरिगुरुविनवरशिष्यरु.

परमात्मननुभाव नररिंगे नीडलु
सुरलोकदिं वर नाम तंदु ।
हिरिगुरु तानागि उद्धरिसिद शिष्य
वरर महिमेयन्नु केळिरिदु ।। १ ॥

सिद्धिय बलदि प्रसिद्धिय पडेदांध्र
साधु पुरुष ' रघुनाथप्रिय ' ।
बुद्धियु होळेयलु सिद्धगुरुविंनि प्र-
सिद्धपुरुषनाद प्राणप्रिय ।। २ ॥

गुरुतम नेमदि परतम अनुभाव
भाग्यवंत ' भाऊ ' होंदिरुव ।
मरेयल्लि मेरेयुव हिरिगुरु महिमेय
धरेयल्लि मेरेसलु मुंदादव ।। ३ ॥

साधुमुखदि वर साधनवनु पडेदु
साधिसिदनु 'दास' परमार्थव ।
बोधिसि भकुतर दुगुडव बिडिसुत
सादर वैभव गळिसिरुव ॥ ४ ॥

मेलुनामव नित्य बेरळिनिंदेणिसुत
कालकालके तानु नेनेयुवनु ।
कालकर्मगळ कालिलि ओदेयुव
सावळसंगद ' कक्क ' तानु ॥ ५ ॥

बयसुव भकुतियि बयसद भकुतियु
नलित ' नापु ' ' भापु ' अल्लवेनु ।
गुरुग्रन्थ ओदुत गुरुसेवे माडुत
गुरुविन बळियल्लि नेलेसिहनु ॥ ६ ॥

हरिभक्त कुलजनादरू ता ' रघुनथार्य '
हरगुरुविगे शरणु बंदिहनु ।
परनिंदेयनु जडिदु गुरुबोधदिं नडेदु
हिरिवचनव जगके सल्लिसिहनु ॥७॥

‘ आर्य ’ न वचनदि आर्यादिगळ बेरसि
आर्यग्रन्थव तानु प्रकटिसुव ।
हिरिगुरुवर्यर बोध ‘ बाबाचार्य ’
सर्वजनर कैयोळिरिसिरुव ॥ ८ ॥
ओलविन छलदिंद काडुव गुरुगळ
बलद महिमेयन्ने नोडुतिह ।
निलिसुत मनेयनु ओलिसुत मनवनु
गुरुकाजवनु ‘ दाजि ’ माडुतिह ॥९॥
चंडियु गुरुगळ कंडते काडलु
गौडतियनु तौडुगौळिसुतिह ।
पुंड ‘ पंढरीनाथ ’ गुरुविन वरशिष्य
मंडलदलि स्थानगळिसुतिह ॥ १० ॥
गुरुविन कडेहुट्ट किरिमगनादरु
वरशिष्य तानागि बेळेदिहनु ।
हरि ! विठ्ठला ! शिवा ! गुरुवे ! जय ! एन्नुत
चरिप ‘ नरसप्प ’ नदें धन्यनु ॥११॥

इंतु मनोहर संतर महिमेय
संतर्सदिंदलि पाडुवदु ।
संतर पावन जीवनदलि सिदु
अंतरंग शुचि माडुवदु ॥ १२ ॥

भाग ३ रा.

ग्रंथरचनेचा इतिहास.

श्री निंबरगी महाराजांनीं हीं वचनें स्वत: लिहिलीं नाहींत किंवा आपण सांगून तीं कोणाकडून लिहविलेलेहि नाहींत. ते रोज दासबोधाचा अर्थ सांगत. त्यावेळीं त्यांचे तोंडून निघालेल्या अनेक बोधपर वचनांचा श्रीरघुनाथाचार्यांनीं एका पोथीच्या रूपानें संग्रह केला हें वर सांगितलेंच आहे. ही मूळ प्रत होय. इचें वर्णन खाली प्यारा १ मध्यें केलें आहे. या पोथीच्या प्रती खाली नंबर २ ते ६ च्या प्याऱ्यांत लिहिलेप्रमाणें उपलब्ध झाल्या आहेत. त्या अगदीं या मूळ प्रतिबरहुकूम तंतोतंत नाहींत. त्यांत कांहीं पाठभेद आहेत. विशेषत: नंबर ५ च्या प्रतींत हे पाठभेद जास्त महत्वाचे आहेत.

(१) श्री निंबरगी येथील मूळप्रतः–ही पोथी फक्त कांहीं पानें खेरीज करून जवळ जवळ संपूर्ण आहे. ही प्रत स्वतः श्रीरघुनाथचार्यांनीं फार सुंदर व सुवाच्य अक्षरांत लिहिली आहे.

(२) जमखंडी येथील नंद्यापा न्यामगौडा यांजकडून सन १९१८।१९२० चे सुमारास मिळालेली प्रत. या पोथीतील कांहीं भाग रा. रामभाऊ ममदापूर, रा. जमखंडी यांनीं लिहिला असावा असें वाटतें. ही जवळ जवळ संपूर्ण असून चांगल्या अक्षरानें लिहिलेली आहे

(३) उमदी येथील प्रतः–ही श्री. भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचें चिरंजीव रा. कृष्णाजीपंत यांनीं लिहिलेली असावी. पारमार्थिक, एकाक्षरी कोश व औषधी-प्रकरण हीं दोन प्रकरणें यांत नाहींत बाकी तीं रघुनाथाचार्यांच्या पोथीची नक्कलच

आहे. श्री भाऊसाहेब महाराज यांच्या घरीं उमदी येथें रोज वाचावयाच्या चौदा पोथ्यांच्या यादींत या पोथीचा समावेश आहे. या पोथ्या भाऊसाहेब महाराजांचे दुसरें चिरंजीव रा. भीमराव दररोज दुपारीं वाचत असत. व श्री. उमदीकर महाराजांचा मुक्काम उमदी येथें असल्यावेळीं रा. नागापा निंबरगी व इतर मंडळीकडेहि या पोथ्यांच्या वाचनांचे काम असे. भीमरावानी ही पोथी वाचण्याचा क्रम आपण चालविला.

(४) सातलगांवची प्रत:— सातलगांवीं एक प्रत होती. ती गेनबा या नांवच्या एका गृहस्थानें तेथून सोलापूर तालुक्यापैकीं मौजे आचगांव येथें नेली होती. ती होर्तीचे रा. यशवंतगौडा पाटील यांनीं मिळवून आणन दिली. या पोथीतील बराच भाग श्री रघुनाथाचार्यांनीं सातलगांवचें दाजीबा पाटील यांचें करितां स्वतः लिहिलेला दिसतो. व

कांहीं थोडा भाग भवानी गोंधळी यांनीं लिहिलेला दिसतो. रा. यशवंतगौडा निंबाळास येत तेव्हां ते या अगर क्रमांक २ मध्यें लिहिलेल्या पोथीचें पारायण करीत. अशी निदान १०।१५ पारायणें तरी त्यांनीं केली.

(५) चडचाण येथील कानडी लिपींत लिहिलेली प्रत:– ही प्रत चडचाणचे रा. करबसापा आवटी यांनीं आणून दिली ती 'श्री भाऊसाहेब महाराजांनीं आपणास नाम दिले नंतर एका वर्षानें म्हणजे सन १९०१ सालीं आपणांस दिली असे रा. करबसापा सांगतात. ही पोथी उमदी येथील विरक्तय्यांच्या मठापैकीं कोणीतरी इसमानें लिहीली असावी असे वाटते. सदर पोथीचा लेखक बराच बुद्धिमान दिसतो. कारण या प्रतींत त्यानें स्वत:चा कांहीं चांगला मजकूर घातला आहे. उदाहरणार्थ (१) आत्मध्यानानें स्वस्थता प्राप्त होते. 'स्व'

म्हणजें स्वरुप ‘ स्थ ’ म्हणजें स्थिरता, स्वरुपांत स्थिर होणें हीच खरी स्वस्थता होय. (२) अच्युताचे ध्यान केलें असतां मनुष्यहि अच्युतच होतो. हा मजकूर इतर प्रतींत नाहीं.

(६) श्री बाबाचार्य काव्य यांनीं विजापूरच्या ग्रामाधिकारी प्रेसमध्यें सन १९०८ सालीं नागरी लिपींत छापलेले ‘ महाराजवर वचन ’ हे पुस्तक बाबाचार्यांनीं मूळच्या पोथींत कानडी, मराठी, व हिंदी संतांच्या वचनांची भर घालून तिची एक प्रत (Press copy प्रेस कॉपी) तयार केली व तीच त्यांनीं छापून प्रसिद्ध केली. श्री रघुनाथाचार्य हे १८९६ सालीं समाधिस्थ झालें. व जरी हे पुस्तक बाबाचार्यांनीं १९०८ सालीं छापून प्रसिद्ध केलें तरी या पुस्तकाची प्रस्तावना श्री रघुनाथाचार्यांनींच आपल्या हयातींत लिहून ठेवलेली होती असे दिसते. या प्रस्तावनेंत ती प्रत कोणाकरित

लिहीली याचा उल्लेख ' रंगो नरसिंहबाबा काव्य ' असे लिहून केला आहे. श्री रघुनाथाचार्य हे निःस्वार्थीपणें व केवळ परोपकारार्थ श्री निंबरगी महाराजांची वचनें अनेक परमार्थ प्रेमी लोकांस लिहून देत असत असे जे वर म्हटलें आहे त्याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. हें पुस्तक कानडी भाषा शिकणेंस फार उपयोगी आहे हे पुष्कळ साधकांच्या प्रत्ययास आले आहे.

बोधसुधेची हल्लींची प्रत तयार होणें पूर्वी या वचनांच्या मांडणीत अनेक वेळां फरक करणेंत आले त्याचा इतिहास थोडक्यांत खालीं दिला आहे.

(१) प्रथम श्री निंबरगी महाराजांच्या वचनांची जमखंडीची प्रत ही आधारभूत धरून त्याची एक उत्तम नक्कल प्रा. कृष्णराव गजेंद्रगडकर यांनीं सन १९३० सालीं एका वहीत लिहून काढली त्यानंतर त्यावेळीं उपलब्ध असलेल्या सर्व प्रतीचा

अभ्यास करून प्रत्येक प्रतींत वर निर्दिष्ट केलेल्या जमखंडी प्रतीपेक्षां कमीजास्त मजकूर कोणता हे चटकन लक्षांत यावें या उद्देशानें रा. शंकरराव धर्माधिकारी यांनीं एक कोलेशन सीट तुलनात्मक तक्ता तयार केला. पुढें कांहीं दिवसांनीं या तक्त्या-बरहुकूम प्रत्येक उपलब्ध प्रतीतील जादा मजकूर एका निराळ्या वहींत प्रा. कृष्णराव यांनीं लिहून काढला. या वहीतील मजकूर पहिल्या वहीतील जमखंडीच्या प्रतीतील मजकूरांस पूरक असाच होता. त्यामुळें प्रथम कांहीं दिवस या दोन्ही वह्यांतील मजकूर एकत्रकरून पुस्तकरूपानें छापण्याचा विचार होता.

(२) पुढें कांहीं वर्षांनी रा. कृष्णराव यांचे प्रतिवरून मनोहरपंत देशपांडे, अथणी यांनीं प्रौढ कानडी भाषेंत एक प्रत लिहून तयार केली. पण ही भाषा श्री निंवरगी महाराज नेहमी बोलत

असत त्या भाषेहून थोडीशी भिन्न असल्यामुळें व मूळचीच भाषा ठेवणें इष्ट वाटल्यावरून तो प्रयत्न रहित करणेंत आला.

(३) पुढें कांहीं एका शास्त्रीय तत्वाप्रमाणें विषयाची रचना व वचनांची मांडणी करणें योग्य वाटून त्या दृष्टीनें प्रयत्न करणेची सूचना पुढें आल्यावरून श्री. मनोहरपंत यांनीं 'तानू, तन्नू, परू, परमात्मनू' या चार शीर्षकाखाली वचनांचे वर्गीकरण करण्याचे त्याप्रमाणें त्याच्या एक आराखडा त्यांनीं तयार केला व त्यांत सर्व पुस्तक बसविणेचा प्रयत्न केला.

(४) पुढें सन १९४३ च्या दिवाळीच्या सुट्टींत सप्ताहासाठी कांहीं साधक मंडळी आलाहाबादेस जमली असतां वरील वर्गीकरणाबद्दल चर्चा होऊन वरील वर्गीकरणापेक्षां दुसऱ्या एका

रीतीने म्हणजे आधुनिक नीतिशास्त्र व अनुभवशास्त्र यांच्या दृष्टीने या सर्व वचनांचे वर्गीकरण करणे इष्ट वाटल्यावरून श्री. मनोहरपंत यांनीं या सर्व वचनांचे १ आचरणाची मूलतत्वे. २ दुर्गुणत्याग. ३ सद्‌गुण सेवन व ४ परमार्थमार्ग. या चार विभागाखालीं पुनर्वर्गीकरण करून सर्व पुस्तकाची पुनर्रचना केली व हीच रचना या पुस्तकात दिली आहे.

बोधसुधेंची भाषा श्री निंबरगी महाराज नेहमीं बोलत ती विजापुरी कानडी भाषा (dialect) आहे. तुळसीदासाची पदें अवधी भाषेंत, मीराबाईचीं पदें राजस्थानी बोलींत, सूरदासाची व्रजभाषेंत व गुरुनानक यांचीं पंजाबी हिंदींत प्रसिद्ध झालीं आहेत, त्याप्रमाणें निंबरगी श्रीनिंबरगी महाराजांची वचनें त्यांच्या तोंडून सहज आलेल्या विजापुरी कानडी भाषेंत या पुस्तकांत

दिली आहेत. पुनरुक्ति टाळणें व कांहीं बिन महत्वाचा भाग टाळणें या व्यतिरिक्त मूळ वचनांत शक्यतो कांहींच फरक केलेला नाहीं. कुसुमें मूळचीच सुंदर आहेत फक्त त्यांची माला गुंफण्यांत जेवढें कौशल्य दाखवितां येईल तेवढें दाखविणेचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे.

हिंदी ही हिंदुस्थानची देशभाषा. त्याचप्रमाणें देवनागरी ही अखिल हिंदुस्थानची देशलिपी असावी असा प्रयत्न चालू आहे. या दृष्टीनें हे पुस्तक देवनागरी लिपींत छापले आहे. हे पुस्तक तयार करण्याचें कामीं श्रीयुत मनोहरपंत देशपांडे यांनीं फार परिश्रम केले. त्यांनी बोधसुधेच्या कानडी काव्यांतहि अनुवाद केला असून बोधसुधेचे मराठी भाषांतरहि त्यांनीं केलें आहे. यांच्या हस्तलिखित लिपीहि कानडी न समजणाऱ्या मराठी वाचकामध्यें बऱ्याच प्रचलित आहेत.

भाग ४ था.

बोधसुधेंतील वचनांचा संदर्भ व सारांश.

बोधसुधा हा नीतिशास्त्रावरील व अनुभवशास्त्रावरील एक लहान पण उच्च दर्जाचा ग्रंथ आहे. त्याचे १ नीतीची मूलतत्वें, २ दुर्गुणत्याग, ३ सद्गुण सेवन व ४ परमार्थमार्ग, असे चार भाग आहेत. पहिल्या भागांत मनुष्याच्या आचरणाचें बल, हे देवाच्या बलापेक्षां श्रेष्ठ आहे हे मूलतत्व सांगून (क्र. १) बीजाप्रमाणें जसें पीक येतें, त्यासारखेंच आपल्या बऱ्यावाईट आचरणाप्रमाणें, आपणास बरीवाईट फळें मिळतात. हा सरळ सिद्धांत सांगितला आहे. (क्र. ४) अशा रीतीनें आपल्या सुखदुःखाला आपले आचरणच कारणीभूत असल्यामुळे मनुष्यानें पावलोपावलीं आपले आचरण परिक्षित राहिलें पाहिजे, अशी सूचना दिली आहे.

(क्र. ६) पुढें चांगले आचरण कोणतें व वाईट आचरण कोणतें, हें कसें समजावें याला मांगील संतांचे बोल या बाबतींत प्रमाण आहेत, तेव्हां त्यांच्या वागण्याप्रमाणें वागावें, असें सांगितलें आहे. (क्र. ७) आचरण चांगले ठेवावयाचे म्हणजे, आधीं दुर्गुणांचा त्याग केला पाहिजे. क्रमानेंच दुसऱ्या भागांत, दुर्गुण कोणते व ते कसे टाकावे, दुराचरण केल्यास त्याचे काय काय दुष्परिणाम होतात, याचे विवेचन केले आहे. काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, अहंकार या सहा मुख्य दुर्गुणांचा म्हणजे षड्रिपूंचा प्रथम उल्लेख करून नंतर कपट, अन्याय, आळस वगैरे दुसरे दुर्गुण सोडलें पाहिजेत, अशी शिकवण दिली आहे, व वाईट आचरण केल्यास, पापाच्या प्रमाणांत शिक्षा झाल्यावाचून राहणार नाहीं, अशीहि ताकीद दिली आहे. शिक्षेचे, आधिभौतिक, आध्यात्मिक व आधिदैविक असे

तीन प्रकारहि सांगितले आहेत. आळस हा मुख्य शत्रू असून, तो प्रपंच व परमार्थ दोहोंचाहि नाश करितो, म्हणून त्याला थारा देऊं नयें, अशी सूचना दिली आहे. शेवटीं चिंता ही फार वाईट आहे, चिंतेचें खुळे पीक येते; म्हणून सर्व कांहीं ईश्वराधीन आहे, उगीच चिंता करून काय उपयोग? असा मनाला बोध करावा व फक्त परमेश्वराचेंच चिंतन करावें, देव देण्यास समर्थ आहे अशा कळकळीचा उपदेश करून, वाचकास सद्गुणाच्या मार्गावर आणून सोडले आहे.

दुर्गुणांचा त्याग, ही आचरणाची अभावात्मक बाजू झाली; सद्गुणसेवन ही त्याची भावात्मक बाजू होय. यानंतर तिसऱ्या भागांत मुख्य सद्गुण कोणते, त्यांचे महत्व काय व ते कसे अंगीं आणावेत, यांचें विवेचन केलें आहे. विवेक सद्बुद्धि, इंद्रिय-

निग्रह, अपरिग्रह, सहिष्णुता, अहिंसा, सत्य, सर्वभूतीं आत्मभाव, परोपकार, दया, समाधान, कर्तव्यनिष्ठा इत्यादि सर्व मुख्य मुख्य सद्‌गुण अंगीं आणिले पाहिजेत, असें सांगितलें आहे. प्रपंचांत राहून मजूराप्रमाणें वागावें पण सर्व लक्ष परमार्थावर असावें. मुलें मोठी झाल्यावर प्रपंच त्यांचेवर सोपवून, पुन्हा परतून त्याकडे पाहूं नये; आपण परमार्थांत मग्न होऊन रहावें. षड्रीपूंशीं झगडून, सद्‌गुणांचा साठा करून, देवाचे प्रेम संपादून 'स्वराज्य' म्हणजे आत्म्याचें अविनाशी सुख प्राप्त करून घ्यावे असें जीविताचें ध्येय तिसऱ्याभागांत स्पष्टपणें सांगितले आहे.

परमार्थमार्ग या चौथ्या भागांत परमार्थ कसा करावा हें सांगितलें आहे. संसार क्षणभंगूर व दुःखमय असल्यामुळें, त्यांतून मुक्त होण्यासाठीं दुर्गुणत्याग

व सद्‌गुण संपादन करून, गुप्तरूपाशीं म्हणजे परमेश्वराशीं ऐक्य पावलेल्या गुरूला शरण जावें, व त्याजकडून अनुग्रह घेऊन नेहमीं परमेश्वराचें ध्यान करीत असावें. 'करसे काम करो, हरिसे ध्यान धरो' अशा रीतीनें वागावें. संसारांत उदासीन पण परमार्थांत उल्हसित रहावें. नामस्मरणांत खंड पडूं दिला नाहीं, म्हणजे स्वरूपीं स्थिरता येऊन स्वस्थता लाभते. परमार्थाच्या वाढीसाठीं सत्संगाची अत्यंत आवश्यकता आहे. साधूच्या संगतीप्रमाणेंच नामाची व सद्वस्तूची संगति ही सत्संगतिच होय. संकटे आलीं तरी परमेश्वरावरील श्रद्धा ढळूं न देतां अंत:करण-पूर्वक भक्ति करीत रहावें. संकटे आणून परमेश्वर आपली परीक्षा पहात असतो. म्हणून त्यांत शेवटीं आपले कल्याण आहे, असा दृढ विश्वास धरावा. परमार्थांत थोडी जरी प्रचीति आली तरी जीविताचें

सार्थक होतें, असें आश्वासन देऊन हा ग्रंथ संपविला आहे.

वरील विवेचनावरून या पुस्तकाची रचना आधुनिक नीतिमिमांसा व परमार्थमीमांसा, यांच्या दृष्टीनें कशी केलेली आहे, हें सहज लक्षांत येईल. प्रपंचांत राहून परमार्थ साधणें हें मुख्य ध्येय सांगून तें प्राप्त करून घेण्यासाठीं सर्व सद्‌गुणांची आवश्यकता कशी आहे हें दाखविलें आहे.

ज्ञान (wisdom), श्रद्धा (faith), समता (justice) यापैकीं एकादा सद्‌गुण मूलभूत धरून त्यापासून इतर गुण काढावयाचे अशी कांहीं पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञांनीं पद्धति घातली आहे; याच पद्धतिप्रमाणें भक्तिपासून सर्व गुण प्राप्त होतात असा या पुस्तकाचा अंतर्गत सिद्धांत आहे. आतां या पुस्तकातील वचनांत सांगितलेल्या महत्वाच्या मुद्यांचा विचार करूं.

भाग १ आचरणाची मूलतत्वें.

चौऱ्याशीं लक्ष योनींत फिरून सुखःदुख भोगतांना, पशुपक्षी वगैरे योनीतील, निरनिराळ्या जन्मांत, दुसऱ्यावर केलेल्या उपकाराचे फळ म्हणून हा नरदेह सुदैवानें प्राप्त होतो. म्हणून तो प्राप्त झाल्यानंतर देहांत प्राण आहे तो पर्यंत साधन करून जन्माचे सार्थक करून घ्यावें (क्र. १). बाल्य, तारुण्य, प्रौढत्व व वार्धक्य अशा चार स्थिती मनुष्याला आहेत. बालपणीं अज्ञान असतें, तर पुढें तारुण्याचें भुररें चढलें म्हणजे, मनुष्य आईबापांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां बायकोचेंच ऐकत असतो. गारुड्याच्या माकडाप्रमाणें बायको जशी नाचवील तसा हा नाचतो. मागील सदाचरणाच्या बलामुळें त्याला मुलें होतात. पण जर तो पापाची भीति न बाळगतां वागेल तर त्यास दुःख भोगावें लागते. वृद्धपणीं आपल्या उद्धाराची काळजी न करतां तो

बायकामुलांचीच काळजी करीत असतो. वृद्धपणीं सर्व आयुष्यांतील आपल्या सर्व पापांची झडती द्यावी लागते. म्हणून त्या स्थितींत सावध राहून नामस्मरण करून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावें (क्र. २). आपले आचरण आपल्यास तारतें. आचरणाचें बल हेंच श्रेष्ठ बल होय. किंबहुना देवाच्या बलापेक्षांहि आपल्या आचरणाचे बल श्रेष्ठ आहे असें म्हटले तरी चालेल; म्हणून आपल्या वागणुकीचाच भरंवसा धरावा, दुसऱ्या कशाचाही धरूं नये. देव मनुष्याच्या अंतःकरणांत तराजू घेऊन बसला आहे. तो मनुष्याच्या आचरणाप्रमाणें त्याला तोलून फळ देत असतो. आपल्या दुःखाबद्दल लोक आपल्या वागणुकीला दोष न देतां देवाला दोष देतात पण हे बरें नव्हें. आपणाकडून दुराचरण झाल्याशिवाय एक साधा काटाहि मोडणार नाहीं. आपण चांगलें वागलों तर ब्रह्मा, विष्णु, महेश

देखील आपलें वाईट करूं शकणार नाहींत. आपण दुराचारी बनल्यास दुःख ठेवलेलेंच आहे. ते तीनी देवानांहि निवारतां येणार नाहीं. आपल्या आचरणापेक्षां मोठें बल देवाचें देखील नाहीं. " मी केलेले कर्मच जर बलवान झाले तर तूं काय करूं शकणार आहेस ? असें पुरंदरदासानीं म्हटलें आहे. (क्र. ३) पेरावें ते उगवतें. कडू जिरे पेरून गहूं कसा उगवेल ? " देवाच्या मनांत आले तरच रोग आपला नाश करूं शकेल. रोग म्हणजे देवाच्या हातांतील एक हत्यार होय. नुसता रोग काय करील ? यासाठी सदाचरणानें देवाचें प्रेम संपादन करून घ्यावें. म्हणजे आधिव्याधि भोगाव्या लागणार नाहींत. (क्र. ४) ध्वनीप्रमाणें प्रतिध्वनि होतो. 'हैक' असा उच्चार केला तर 'हैक' असाच पडसाद येतो. आपण दुसऱ्यांशीं जसें वागावे, तसेंच ते आपल्याशीं वागतात. म्हणून सर्वांशीं चांगले

वागून त्यांना सुख देत असावें. (क्र. ५) पावलो पावलीं, श्वासोच्छ्वासीं आपल्या आचरणाची परीक्षा करीत असावी.

श्वास श्वासपे हर भजो, वृथा श्वास मत खोल ।
श्वास विरानी पाहुनि, आना होय न होय ॥

या दोह्यांत म्हटल्याप्रमाणें बाहेर टाकलेला श्वास पुन: परत येईल किंवा नाहीं याची शंका आहे. (क्र. ६) मागील साधुसंतांनीं केलेल्या उपदेशा प्रमाणें वागणें म्हणजेंच सदाचरण (क्र. ७). संकट आलें असतां व्यंकटरमणाची प्रार्थना करितात. तसें न करितां आपणाकडून चांगलेंच आचरण घडावें अशी आपण अंतरात्म्याची प्रार्थना करावी (क्र. ८).

भाग २ दुर्गुणत्याग.

दुसऱ्याचें कामिनी, कांचन अगर शेतभात यांच्या जाळ्यांत आपण सांपडूं नये. त्यांच्याकडे

आशाळभूतपणानें पाहिल्यास डोळे दग्ध होतात; त्यांची इच्छा धरल्यास मन दग्ध होतें. मन फारच ऐकेनासें झाल्यास या मोहांतून मला सोडव अशी परमेश्वराची प्रार्थना करावी, परद्रव्य अंत्यजाच्या नरकाप्रमाणें मानून देवानें दिले असेल त्यांत संतोष मानून रहावें. (क्र. ९). जारकर्मानें, द्रव्य, आयुष्य, शरीर व अन्न यांच्या नाश होतोच, पण त्यामुळें मुख्य जीवनाचाच नाश होतो. (क्र. १०) राग हाच खरा अस्पृश्य होय. ज्या घरीं रागामुळें सदैव किरकिर असते तेथें दारिद्रय येण्यास विलंब लागत नाहीं, म्हणून विवेकानें राग सोडावा. मात्र शहाणपणा शिकविण्यासाठीं मुलांना तोंडानें रागें भरावें. पण हातानें रागें भरूं नये. (क्र. ११) पोकळ अभिमानामुळें मनुष्य दुसऱ्यास उद्धटपणानें बोलतो, किंवा मारहाण करतो. उपकार विसरून उपकार करणाऱ्यालाहि त्रास देतो. परंतु दुसऱ्यावर

गर्व करणाऱ्या माणसाशीं लोकहि ताठ्यानेंच वागतात. त्याच्याशीं बोलत नाहींत. त्याला जुन्या खेटराप्रमाणें लेखतात. कामिनीं, कांचन, विद्या, कीर्ति, मलें हे अहंकाराचे झरे होत. ज्या गोष्टीचा आपणास गर्व होतो, तिचा नाश होण्याची वेळ आली आहे असें समजावें. पण देव एकदम नाश करीत नाहीं. अहंकार डोक्यापर्यंत चढू देऊन मग नाश करितो. आपणांस कांहीं प्रचीति आली व ती आळकेपणें दुसऱ्याला सांगितली तर प्रचीति पुनः येणार नाहीं. कशाचाही गर्व वाटूं लागल्यास आपणापेक्षां थोर लोकांची आठवण करावी व एवढ्या मोठ्या लोकांना गर्व नाहीं मग मी कशाचा गर्व धरावा असा स्वतःच्या मनाला बोध करावा. (क्र. १२) दुसऱ्याचें बरें पाहून जळफळणाऱ्याला अन्न मिळणार नाहीं. तळमळणाऱ्याला मुलें होणार नाहींत. दुसऱ्याचें वाईट चिंतलें तर आपलेंच वाईट

होतें. म्हणून मत्सर सोडून दुसऱ्याचें बरें चिंतीत जावें म्हणजे देव आपल्या सदाचरणाच्या प्रमाणांत आपणासही ऐश्वर्य देतो. (क्र. १३) कपटानें द्रव्य घेतल्यास हात दग्ध होतो. त्या हातानें पेरलेलें बी उगवत नाहीं. कपटानें दुसऱ्याचे द्रव्य घेतले तर आपले अल्प पुण्य संपल्यावर एका क्षणांत तें आलें तसें जातें (क्र. १५). बायकामुलांबद्दलचा मोह आपल्यास बांधून टाकतो. मनाला बोध करून तो होईल त्यावेळीं त्याचा नाश करावा. हाच नित्य होम. याप्रमाणें सर्व दुर्गुणांचा होम केल्यासच मोठें पुण्य घडतें (क्र. १६). अन्याय केल्यानें अनाहूत म्हणजे अनपेक्षित संकटे येतात, न्यायानें वागल्यामुळें कदाचित नुकसान होतें; पण ते आपणांस माहीत असल्यामुळें सहन करतां येतें; तसेंच आपण न्यायानें वागून, आपलें आचरण चांगलें राखल्यानें अंतरसाक्ष आत्माराम तें

नुकसान भरून देण्यास समर्थ आहे. परंतु अन्याया-मुळें अकस्मात येणाऱ्या आपत्ती, म्हणजे प्रौढपणीं बायको अगर वृद्धापकाळीं मुलें मरणें, अशा प्रकारचे तडाखे सहन करवणार नाहींत. मनुष्य मार सोसेल पण देवाचा मार सोसवणार नाहीं. आपलें आचरण चांगलें राखण्यासाठीं नुकसान झालें तरी तें एक विघ्न टळलें असें समजावें. (क्र. १७). पापाच्या प्रमाणांत शिक्षा होतें. न कळत केलेल्या पापामुळें न कळत नुकसान होतें. कळून सवरून पाप केल्यास कडक शिक्षा होते (क्र. १८). नीतीला सोडून वागल्यामुळें तीन प्रकारच्या शिक्षा होतात. त्या म्हणजे, आधिभौतिक आध्यात्मिक व आधिदैविक या होत; दुसऱ्याकडून म्हणजे इतर लोक, भूत-पिशाच्च, पशुपक्षीं वगैरे प्राणि, वारा पाऊस, अग्नि वगैरे पंचमहाभूतें, यामुळें होणारें दुःख, ते आधि-भौतिक दुःख होय. मनाला दुःख किंवा शरीराला

व्याधि हे आध्यात्मिक; देवाकडून होणारी शिक्षा, अगर धरणीकंप, महापूर, तसेंच रोगांच्या सांथी, महायुद्धें इत्यादिमुळें होणारे दुःख, तें आधिदैविक होय (क्र. १९). संसारांत कोणतेंही काम चोरून करूं नये. जे काम करीत असता दुसऱ्याच्या नजरेस येऊं नये असें वाटतें, तें पाप होय. परमार्थ-साधन मात्र चोरून करावें (क्र. २०). आळस हा मुख्य शत्रू होय. त्याला जे आश्रय देतात. त्यांचा घात करणें हा त्याचा धर्म आहे. आळस प्रपंचाप्रमाणें परमार्थांतहि घात करतो. नामस्मरण करण्यास बसलें म्हणजे झोप येणें हा आळसाचा स्वभावच आहे. परंतु अशा वेळीं हट्टानें नाम घेत बसावें. असे कांहीं दिवस गेलें म्हणजे झोप जातें. गादीवर बसून झोप येत असेल तर नेमासाठीं उठल्याबरोबर गादी गुंडाळून दूर ठेवावी. जें काम करतांना आळस येतो तें त्याक्षणींच करावें. प्रथमतः मन घट्ट करावें म्हणजे कांहीं दिवसांनीं आळस नाहींसा होतो (क्र.

२१). चिंता फार वाईट. तिचें पीक झपाट्यानें वाढतें. म्हणून देवाचें मनांत येईल तेंच होतें, मी व्यर्थ चिंता करून काय उपयोग. असा विवेक करून, चिंता वाटूं लागतांच तिचा अंकुर खुडून काढावा. लोक जन्मल्यापासून मरेपर्यंत चिंताच करतात. चिंता करावी तशी ती वाढतच जाते. देवाच्या मनांत असेल तेंच तो करतो. लोक मात्र उगाच चिंता करून दमतात. अगोदर आपल्या वस्तू जपाव्यात. त्या हरवल्यावर चिंता करूं नये. देव देण्यास समर्थ आहे. आपण सदाचरणानें वागल्यास कोठें कांहीं जाणार नाहीं. गेलेले परत येईल, असें समाधान मानावें (क्र. २२). साधकानें संसाराची चिंता सोडून द्यावी व आत्मा अधिक कसा दिसेल, नामामृत कधीं मिळेल अशी निर्गुणाचीं म्हणजे देवाची चिंता करावी. " जयाचे कुळीं चिंता । झाली ईश्वराची पतिव्रता ॥ या

ज्ञानेश्वरींतील वचनाप्रमाणें स्थिती व्हावी. आपण देवाची चिंता केली म्हणजे देव आपली चिंता वाहतो व संसारांत कांहींहि कमी पडूं देत नाहीं. चिंतेचा अंकुर मोडण्यास व मन शुद्ध होण्यास गुरुकृपेनें मिळालेल्या नामाचें स्मरण करणें हें एकच साधन आहे. नामस्मरणानें चिंता आपोआप नष्ट होते (क्र. २३).

भाग ३ रा सद्गुण संपादन.

सर्व दुर्गुणाबरोबर लढण्यास विवेक हेंच एक मोठें हत्यार आहे (क्र. २४). आत्म्याला न सोडतां त्याचें अखंड ध्यान करणें यालाच सद्बुद्धि म्हणावें " जिथे परमात्माचि अवधि । " असें ज्ञानेश्वरींतहि याच बुद्धीचें वर्णन केलें आहे. ऐन प्रसंगीं द्रव्यादिकांचें बल कामास येत नाहीं. एक सद्बुद्धिच आपणास तारते. म्हणून ' बुद्धि दे रघुनायका ' अशी नेहमीं

प्रार्थना करावी. (क्र. २५). इंद्रिये हातांत घेतली पाहिजेत. त्यांचे ऐकूं नये. ते मागतील ते विषय त्यांस न देतां मोडून काढावें. इंद्रियांना हातांत ठेवील तोच खरा साधु. योद्धा व सिद्ध (क्र. २६). प्रथम कामालाच ठार करावें. कोणत्याही गोष्टीची वासना झाल्यास, मला ही कशाला हवी, असा विवेक करून मनाची हाव मोडून काढावी. म्हणजे क्रोधहि येणार नाहीं. कामच नसला म्हणजे क्रोध कोठून येईल ? मन विकारवश झाल्यास शरीर दृढ करावें. त्याला मनामागें जाऊं देऊं नये. " मन गया तो जाने दो, मत् जाने दो शरीर. " मनानें विकारांनीं नच सोडलें तर साधनाच्या बळानें त्याला हातांत आणावें. उत्तम मनुष्यानें विकारशून्य असावें. कारण मरणसमयीं कोणावर लोभ अगर मोक्ष राहिला, तर पुनः जन्म घ्यावा लागतो (क्र. २७). कोणावरहि ओझें घालूं नये.

इतरांकडून कांहीं घेतल्यास तें आपणास पुरणार नाहीं. यामुळें हात दग्ध होईल. ' तुलसी कर पर कर करे, करतल कर । न करे जा दिन कर तल कर करे, वा दिन मरण करे ॥ " वैदिक जंगमादि लोक दान घेऊन आपला हात दग्ध करून घेतात. त्यामुळें त्यांनीं हातीं घेतलेल्या कामास यश येत नाहीं व संसारातहि त्यांना पुरें पडत नाहीं (क्र. २१) अंगीं सहनशीलता अगर सहिष्णुता असावी. अन्याय हे आत्म्याचा नाश करणारे विष आहे. अन्याय करणारे लोक त्या विषानेंच मरतात; म्हणून आपण अन्याय करणाऱ्यांनां शिक्षा करण्याचें कारण नाहीं. आपल्या दोषाबद्दल आपणास कोणी नांवें ठेविलीं तर त्यांनीं आपणास शहाणपण शिकविलें असें समजून त्यांचे उपकार मानावें. " जितकें सहन तितकें जीवन; " ताप सहन करणें म्हणजेच तप. आपण समाधानाचा समुद्र होऊन

राहावें. शांत असेल तोच संत. जो आपली वृत्ती स्थ करील त्यासच संत म्हणावें. थोडें सहन केलें तर पुढें येणारीं असंख्य दुःखें टाळतां येतील, म्हणून सहिष्णुतारूपी अल्प किंमत देऊन, स्वस्ताईनें देवाकडून पुष्कळ सुख मिळवावें. असा फायद्याचा व्यापार करावा (क्र. ३०). परांतरासि न लावावा ढका' कोणत्याहि कामांत लोकांना हळहळ वाटेल अशा प्रकारचें वर्तन करूं नये. कोणाचा तळतळाट घेऊन घर बांधलें तर त्या घरांत राहींपर्यंत आपणास दुःखच होईल (क्र. ३१). खोटें कधींहि बोलूं नये. आपण कधींहि असत्य न बोलण्यांचें व्रत पाळलें म्हणजे आपल्या तोंडून निघणारा शब्द केव्हांहि असत्य होणार नाहीं. नेहमी खरें बोललें म्हणजे आपण बोलूं तें खरें होईल, खरें बोलल्यामुळें घरदार, धनदौलत सर्व कांहीं गेलें तरी जावो' अनंत हस्तांनीं देणारा तो कमलावर समर्थ आहे.

तो देईल तेंच पुरेल. लोकांनीं देऊन कितीसें पुरणार? खोटें बोलून जगण्यापेक्षां खरें बोलून मरणें बरें. मात्र आपण खोटें बोलल्यामुळें एकाद्यावरचें मृत्यु-सारखें महासंकट टळत असेल, तर कदाचित खोटें बोललें असतां चालेल. त्यामुळें आपणांस त्रास होईलच. पण दुसऱ्याच्या हितासाठीं तो सोसला पाहिजे. आपल्या स्वार्थासाठीं मात्र केव्हांहि खोटें बोलूं नये (क्र. ३२). वडिलांची सेवा करावी. आपल्या सेवेनें संतुष्ट होऊन त्यांनीं आशिर्वाद दिला तर, संतति संपत्ति, आयुष्य, बल, कीर्ति सर्व कांहीं प्राप्त होतील. वडिलांचें प्रेम संपादावयाचें असेल तर करणी केली पाहिजे. करणी खेरीज अंत:करण मिळणार नाहीं. वडिलांनीं सांगण्यापूर्वींच, त्यांच्या हातांतील काम घेऊन आपण अंत:करणपूर्वक उत्तम रीतीनें करून दाखवावें. मोठ्या कामापेक्षां, जीं कामें करण्यांत माणसाला कमीपणा वाटतो, अशीं

हलकीं कामें केल्यानेंच वडिलांचें प्रेम लवकर संपादन करतां येतें (क्र. ३३). दुसऱ्याचें दुःख तें आपलेंच दुःख आहे असें समजावें. " सर्वहि सुखी व्हावें ऐसी वासना " धरावी. आपलें कोणी नुकसान केलें तर आपल्यास वाईट वाटेल, तसेंच दुसऱ्याचें केल्यास, त्याला वाटेल. " आपल्यावरून दुसऱ्यास राखीत जावें " (क्र. ३४). आपल्या जवळ जें कांहीं असेल तेवढ्यांत दुसऱ्यावर उपकार करावा. पण तो कोणालाहि कळूं देऊं नये (क्र. ३५). " दया धरमका मूल है ". सर्वांवर दया करावी. सर्वांभूतीं एकच आत्मा वास करीत असतो. इतरांच्या ठिकाणीं असलेला आत्मा तोच आपणामध्येंहि आहे. म्हणून लोकांशीं निर्दय होणें म्हणजे आत्म्यावरच निर्दय होणें होय. व त्याबद्दल आत्मा आपल्यावर निर्दय होईल. ' केलें तुला पण झालें मला " असें होते (क्र. ३६). परमेश्वरानें जें कांहीं दिलें आहे ते तुच्छ

लेखून, नसलेल्याची अपेक्षा केली, तर तें मिळत नाहींच, पण असलेलेंहि जातें व तेल नाहीं तूप नाहीं अशी स्थिति होते (क्र. ३७). उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट चाकरी, यापैकीं जो उद्योग देवाच्या इच्छेनें आपल्या वाटयास आला असेल तो अंत:करणपुर्वक करावा. तो न केल्यास अंतरात्म्याला राग येऊन तो आपली खोड मोडतो (क्र. ३८). शरीर राबवून काम करावें व निढळाच्या घामाची भाकरी खावी. आळसानें उगीच बसून कर्ज करून खाऊं नये. हलाल खावें, हराम खाऊं नये. पगार देणाऱ्या मालकास आपल्या कामानें संतुष्ट केलें म्हणजे सर्व कामांत आपल्याला यश येतें. शरीर राबवून राबवून झिजवावें. ' सुखा अंग देऊं नये. ' सेवक होऊन राबावे व राजा होऊन जेवावें. कष्ट करून शरीर थकलें तरी ज्यावेळीं जें करावयाचें त्यावेळींच तें काम करावें; मग कसलीहि चिंता न

करतां जें असेल त्यांत सुखानें समाधानानें जेवावें. काम इमानानें न करितां पगार घेतल्यास, हात दग्ध होतो. सर्वांत श्रेष्ठ इमान म्हणजे सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणें शरीर आत्म्याकडे लावणें हें होय. (क्र. ३९) प्रपंचांत परमार्थ करावा. परमार्थ सोडून केवळ प्रपंच करूं नये. परमार्थ साधणें हाच आपला मुख्य धर्म होय. त्याला अनकूल होतील तितकीं व त्या वेतानें सर्व कामें करून काळजी सोडून सर्व कांहीं देवाच्या इच्छेप्रमाणें होऊं दे, असा निश्चय करून, आत्म्याचें ध्यान निरंतर न सोडतां करावें (क्र. ४१). दक्षतेनें संसार करून आपलीं मुलें संसाराचा भार घेण्याइतकी मोठीं झाली म्हणजे, संसार त्यांचे स्वाधीन करून, आपण परमार्थांत बुडून रहावें. पुनः परतून संसाराकडे पाहूं नये (क्र. ४२). बाह्य युद्धांत जय मिळाल्यास थोडे दिवस राज्य मिळेल. राज्य करीत असतां जेवढें

सुख तेवढेंच दुखःहि होतें. निर्भेळ सुख मिळत नाहीं. संतति आहे तर संपत्ति नाहीं असें होऊन सुखदुःख दोनीहि भोगावी लागतात (क. ४३). यासाठीं बाह्य युद्ध न करितां वेगळ्या प्रकारचें उत्तम युद्ध म्हणजे अंतर्युद्ध करावें. अहंकार बल, दर्प इत्यादि विकार व दहा इंद्रियें हीं आडवी येऊन आत्मानुभव वाढू देत नाहींत. करितां अहोरात्र त्यांच्याशीं युद्ध करून, दोषरूपी सर्व वैऱ्यांनां मारून टाकावें 'राज्यान्ते नरकः' असें बाह्य युध्दानें होतें. परमार्थात तसें होत नाहीं (क.४४) स्वराज्य म्हणजे आपले सुख; आत्म्याचें अविनाशी सुख या स्वराज्यांत कशाचीहि उणीव नाहीं. हे सुख दुःखविरहित असतें. अंतर्युद्ध करून स्वराज्य मिळवावे. या युद्धांत मरण आलें तर केवळ मुक्ति मिळते. व जय आला तर इहलोकी सुख व परलोकी मुक्ति ही दोनी मिळतात. धारातीर्थी मरण पावल्यास मुक्ति मिळते असें म्हणतात. ते या

अंतर्युद्धाच्या धारातीर्थातच. म्हणून सर्वांनीं असें युद्ध करून स्वराज्य मिळवून मुक्त व्हावें (क्र. ४५).

भाग चौथा परमार्थमार्ग.

संसार पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें आहे. ती केव्हां फुटेल याचा नियम नाहीं. देवाला सोडून संसारात सुख शोधणें हे मृगजळानें साळीं केळीं पिकविण्यासारखेंच आहे. संसार म्हणजे जवसाचें पेव. त्यांत उतरलें तर मनुष्य तळालाच जातो (क्र, ४६). सर्व जन्मामध्यें प्रपंच करून, देवाला न जाणतां, अनीतीनें द्रव्य मिळवून विषयसुख भोगलें म्हणून, जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत प्राणी–मनुष्य–सांपडतो. आतां तरी या उत्तम नरदेहांत. निद्रा, आळस सोडून दुर्गुणाबरोवर लढून, अहोरात्र दक्षतेनें, सदाचरणानें वागावें व सद्गुरूला शरण जाऊन, देवाचे प्रेम संपादन करून शाश्वत सुखांत रहावें (क्र. ४७). गुप्तरूपाशीं ऐक्य पावलेला महात्माच सद्गुरु होय.

अगोदर असा सद्गुरु भेटणें हें कठीण, मग त्याच्याकडून नाम मिळणें त्याहून कठीण. ‘ सब जग अंधा ’ अशी आज स्थिती आहे. म्हणून सर्व लोक वागतात तसें न वागतां सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें वागून, ध्यान करून चित्प्रकाश पहावा म्हणजे जन्माला आल्याचें सार्थक झालें (क्र. ४८). सद्गुरूचें प्रेम संपादन करून ‘करसे काम करो,” हरिसे ध्यान धरो, चढते उतरते दमकी खबर रखो ” या कबीराच्या उक्तीप्रमाणें हातानें काम, आणि मनानें ध्यान करीत असावें. संसारामध्यें मजुराप्रमाणें असावें. म्हणजे कुटुंबियांच्या अन्नवस्त्राला कमी पडणार नाहीं इतकेंच मिळविण्यासाठीं आपला धंदा चांगल्याप्रकारें करावा. व सर्वकाळ आत्मध्यानांत घालवावा (क्र. ४९). “ तिष्ठन्देहे गृहेशोऽप्यतिथिरिव निज धाम गन्तुं चिकीर्षुः । ” या वृत्तीनें संसार आपला नव्हे असें जाणून प्रपंचांत उदासीन असावें. परंतु कुटुंबांत कोणाला कांहीं कमी

पडूं देऊं नये. परमार्थांत मात्र उल्हास असावा. परमार्थ हेंच आपलें परमश्रेष्ठ कर्तव्य आहे हें जाणून तो उल्हासानें व प्रेमानें चालवावा. हातानें काम करीत मनानें भक्तिपूर्वक नाम घेत असावें (क्र. ५०). अखंड देवाचें स्मरण ठेवावें. विस्मरण पडूं देऊं नये. "आठव तो ब्रह्म, नाठव तो भवभ्रम." स्मरणांत यश-कीर्ति-प्रताप आहे. देवाचे चिंतन करीत त्याचें दर्शन घेत राहिल्यानें स्वस्थता प्राप्त होतें. 'स्व' म्हणजे स्वरूप. 'स्थ' म्हणजे स्थिरता. स्वरूपीं स्थिर झाल्यावर सर्व प्रकारें स्वास्थ्यच प्राप्त होते. सत्य असलेला अर्थ म्हणजेच स्वरूप होय (क्र.५१) सत्संग म्हणजे (१) सज्जनांचा, श्रेष्ठ जनांचा संग; (२) सद्गुरूनीं दिलेल्या नामाचें स्मरण म्हणजे सत्संगच; (३) नाम निरंतर श्वासांत ओवणें हाहि सत्संगच; आणि (४) सद्वस्तूचें सतत अनुसंधान अगर साक्षात्कार हाहि सत्संगच. अच्युताची संगति

धरली म्हणजे आपणहि अच्युतच होतो. ईश्वराच्या ज्या गुणाचें ध्यान करावें तो गुण आपल्यांत उतरतो (क्र. ५२). विकारांत मन अडकलें तर त्यांतून बाहेर काढण्याचें सामर्थ्य फक्त नामांतच आहे. सर्वच गोष्टींत नामच आपणास तारतें. म्हणून अहोरात्र आत्मध्यान करीत असावें (क्र. ५३). निद्रा, जांभई वगैरे देहस्वभाव सोडून साधन म्हणजे नामस्मरण करावें. शरीर नको म्हणत असले तरी त्याला कष्ट देऊन साधनाला लावावें (क्र. ५४). सर्व कांहीं देणारा, किंवा नेणारा अगर रक्षण करणारा परमात्माच आहे. त्याला विसरून उगीच कल्पना केल्या तर त्या सिद्धीस जाणार नाहींत. म्हणून देवाच्या मनास येईल त्याप्रमाणें होवो, "Let thy will be done." अशी भावना करून कल्पनेचें बीज नाहींसें करावें व साधन करावें. " जो प्रभु कीन्हों सो भला कर

मानो " असें गुरु नानकांनीं म्हटलें आहे. निर्विकल्पाची म्हणजे ईश्वराचीं कल्पना केली म्हणजे सर्व कल्पनांचा नाश होतो (क्र. ५५). आपण आपल्या दुर्गुणांचा त्याग करावा. देव आपली परीक्षा पाहणेसाठीं आपणांवर संकटें आणितो. संकटें आलीं असतां आपल्या दुर्गणांचा त्याग करून देवाची सेवा करण्यास आपण तयार झालो म्हणजे तो आपला अंत पहात नाहीं. उलट तो आपल्यावर कृपाच करतो. " कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे " (क्र. ५६).

देवाच्या राज्यांत सर्व कांहीं तोलून होतें. " जैसा भाव तैसा देव. " आपण देवाशीं वरपंग भावानें वागल्यास देवहि आपणावरोबर वरपंगानेंच वागतो–आपलीच भावना आपणांस फळते (क्र. ५७). आत्म्याची चाकरी करणें हाच मनुष्यमात्राचा धर्म होय. एका यःकश्चित् मनुष्याची सेवा केली तरी

आपल्या पोटास अन्न मिळतें. मग सकळाठायीं असलेला ‘अनंतहस्त’, सर्वांपूर्वी असलेला आदिदेव परमात्मा, त्याच्या आज्ञेंत राहून त्याची चाकरी केली असतां, तो संसारांत उणीव पडूं देईल काय? म्हणून निरंतर ईश्वरध्यानांत मग्न होऊन आपला परमार्थाचा अनुभव वाढवीत असावें. ‘सर्व धर्मांमध्यें धर्म, स्वरूपीं राहणें हा स्वधर्म”. सदाचरणानें वागून देवाची चाकरी करून भाकरी मागावी. देवाची चाकरी करणें हाच मुख्य धर्म. हाच स्वधर्म होय. म्हणून कोणतेंहि काम देवाकडे पहात त्याचें स्मरण करीत करावें. लौकिकाकरितां म्हणजे लोकांना खूष करण्याकरितां कांहीं करूं नये. तर आत्म्याकरितांच म्हणजे आत्म्याचें प्रेम संपादण्याकरितांच सर्व कांहीं करीत रहाणें हाच आपला मुख्य आचार होय. ज्यानें देव मिळतो तेंच शुद्ध पुण्य (क्र. ५८)। सर्व कामांत आत्म्यासच पुढें करावें.

ध्यान करून पाहिलेला चित्प्रकाश अगर ऐकिलेला अनाहत नाद म्हणजेच आत्मा. कोणतेंहि काम करतांना देव आपल्यापुढें आहे कीं नाहीं हें पहावें. देव पुढें असेल तर त्या कार्यांत यश येईल (क्र. ५९). संसार आपला मानूं नये. सर्व कांहीं आत्म्याच्या स्वाधीन आहे. त्याच्या इच्छेखेरीज काडीहि हालत नाहीं. हें जाणून संसार त्याचेवर सोंपवावा व निरंतर त्याचें ध्यान करून त्याचें प्रेम संपादन करावें व त्याची प्रभा पहात असावी. त्याची प्रभा पाहण्यासाठींच त्यानें आपणास डोळे दिले आहेत. परमेश्वराच्या स्वरूपाचा बिंदुमात्र जरी अनुभव आला, त्याची अल्पशीहि खूण दिसली तरी त्या पुण्याच्या बलाने प्रपंचांत संपत्ति वगैरे सुखें मिळून शेवटीं मोक्ष मिळतो. तीच प्रचीति वाढवून अधिकाधिक चित्प्रकाश ज्यांच्या डोळ्याला दिसतो

ते जिवंत असतानांच मुक्त होऊन ' मराणा ऐलीकडेच ' परमात्म्याला मिळून जातात, त्याच्याशीं ऐक्य पावतात, यांत संयम नाहीं (क ६०).

भाग ५ वा

श्री निंबरगी महाराजांच्या पदांचा सारांश.

श्री निंबरगी महाराजांनीं केलेली बारा पदें या पुस्तकांत दिलीं आहेत. तीं पदें त्यानींच केली आहेत यांत शंका नाहीं. आणखीहि कांहीं पदें त्यांच्या नांवावर मोडतात, त्यांतील कांहीं भाग दुसऱ्या कवींच्या कृतीशीं जुळणारा असल्यामुळें ती सर्व पदें त्यांचीच आहेत असें आज खात्रीलायख सांगतां येणार नाहीं. म्हणून तीं या पुस्तकांत दिली नाहींत, या पुस्तकांत दिलेल्या कांहीं पदांचा त्यांच्या जीवनांशीं संबंध आहे. त्याबद्दलची माहिती, त्या पदांतील महत्वाचा भागाचा सारांश पुढें देतांनां दिली आहे.

पद १ लें— सद्गुरूच्या चरणाकमलीं भृंग होऊन रहा. अशाश्वत अशा नरजन्माला आला आहेस. म्हणून साधूची संगति

धर व परतत्व जाणून घे- मौन धर, दृढ नासिकाग्र दृष्टि ठेव; ज्ञानज्योतीमध्यें रंगून डोलत रहा. व निःसंग हो. मुप्पिन मुनीनीं सांगितल्याप्रमाणें काडसिद्धाला जाऊन त्याच्यापुढें नमस्कार घाल. (मुप्पिन मुनी या नांवनें येथें श्री निंबरगी महाराजांनीं आपल्या सद्‌गुरूंचा निर्देशन केला असावा. दुसऱ्या पदांत अगर इतर कोठेंहि आपल्या सद्‌गुरूंच्या नांवाचा त्यांनीं उल्लेख केलेला नाहीं.)

पद २ रें:— श्री निंबरगी महाराज एकदां विहिरीमध्यें स्नान करू येत असतां एक मोठा नाग वरून त्यांच्याकडे फूत्कार टाकीत येतांनां त्यांना दिसला, व नामस्मरण केल्याबरोबर तो नाहींसा झाला ही हकीकत मागें आलीच आहे. ती हकीकत घडल्याबरोबर त्यांनीं हे पद रचिलें आहे.

" सद्गुरूनें दिलेलें नामच तारते. नामाचेंच हें बल आहे. नामानेंच, प्रल्हाद द्रौपदी, गजेंद्र, ध्रुव इत्यादि भक्तांचें रक्षण कलेलें आहे. **आऊंचें** बंधन तोडणारें नामच आहे. गुरुलिंगजंगम यांनीं दिलेल्या नामाचा जप केला असतां मोठें पुण्य मिळतें. "

पद ३ रें:– कनक नांवाच्या बेरड साधूनें श्री निंबरगी महाराजांचा अपमान केला वगैरे हकीकत मागें आलीच आहे. त्यावेळीं या पदाच्या रूपानें त्यांनीं परमेश्वराची प्रार्थना केली. या पदांत, निंबरगी, भीम, गुरुलिंग-जंगम वगैरेंचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

" हे बलभीमा, माझा कांहीं अपराध नसतां अपशब्द बोलून त्यानें माझा अपमान कां केला? हे देवा दासाचें रक्षण करण्याचें तुझें ब्रीद खरें करून तूं माझें दुःख दूर कर. दगडाच्या मूर्तीच्या आड तूं लपून बसूं नको. दगड फोडून नरसिंहाप्रमाणें तं

बाहेर ये. हे अल्लम् प्रभो, मी तुझ्याजवळ आहे. हे गुरुलिंगजंगमरूप चिन्मयस्वरूपा माझें तन, मन, धन मी तुझ्या चरणावर अर्पण केलें आहे. ”

पद ४ व ५:- एक शाहीर अजिंक्य पत्रें घेत फिरत फिरत निंबरगीस आला व आपल्या पद्धतीप्रमाणें एक कूट सवाल त्यानें महाराजास टाकला. त्याचें उत्तर त्यांनीं नंबर चारच्या पदांत दिलें आहे. या पदांत कामाला एक पक्षी कल्पून त्यावर एक रूपक केलें आहे. शाहिरानें टाकलेल्या सवालास उत्तर दिलेनंतर महाराजांनीं त्यास एक उलट सवाल टाकला. तो नंबर पांचच्या पदांत आहे. यांत विश्वाला एक आश्चर्यकारक वन्य पशू कल्पून त्यावर रूपक केलें आहे. या सवालाचें उत्तर शाहिरास न देतां आल्यामुळें आपण हरल्याचें कबूल करून आपला डफ, तुणतुणें व त्यावरील तुरा हीं सर्व महाराजांना अर्पण

करून तो निघून गेला.

" हे चतुर शाहिरा, तूं विचारीत होतास त्या पक्ष्याचें स्वरूप ओळखून घे. नारदानें त्यावर जाळें टाकिलें, गुरू दत्तात्रेयानें त्याला हातांत घट्ट दाबून धरलें. भीष्माचार्यानें त्यावर धनुष्य रोखला, मारुतीनें त्याला ब्रह्मांडाच्या बाहेर फेंकून दिलें; नरनारायण मुनींनी अष्टमद व षड्रिपू जिंकून त्याला पायाखालीं तुडविलें व शुक्राचार्यानें त्यांस गिळून टाकलें. त्या पक्ष्याची भूक भयंकर आहे. त्यानें सर्व ब्रह्मांड खाऊन अठरा वनस्पतीचें तोंडी लावणें केलें. त्यानें तुला खाल्लें, डफ, तुणतुणें व त्यावरील तुरा, ही सर्व त्यानें खाऊन टाकलीं. मी पाखंड मत सांगत नाहीं. खरें सत्य सांगत आहे. त्याला परमेश्वर साक्ष आहे. गुरुलिंगजंगम पाठीराखे असल्यानें परनिंदेचे पातक तूं आपल्या पदरांत घेऊं नको. "

पद ४ थें:-

पद ५ वें:— शाहीरा, आतां मी एक कूट सवाल टाकतो त्याचे उत्तर दे. एक आश्चर्यकारक वन्य पशू आहे. त्याला सात शिंगें व आठ तोंडें आहेत. हा तुम्हां आम्हांला अगम्य आहे. आपले छपन्न पंख पसरून हा डौलानें नाचत आहे. त्याच्या कमरेला एक सप्तराशीयुक्त करदोटा असून त्यांत एक ॠषि बसलेला आहे. चार प्यादे त्या प्राण्याची शिकार करणेंस निघाले; त्यांना अठरा वीरांनीं मदत केली. त्याच्या अष्टादश कमळाच्या आकाराच्या काळजांत बाण रुतून त्याचे डोकें जमिनीवर पडलें; त्यामुळें पृथ्वी हालूं लागली. निबरगी क्षेत्र खरोखर धन्य होय. कारण त्या ठिकाणीं आदिनारायण हा गुरुलिंगजंगमरुपानें अगर निर्बैल स्वरूपानें वास करीत आहे.

पद ६ वें:- " आजपर्यंत चार वेद, निरनिराळीं शास्त्रें, देव देवता व्रतें वगैरे हीं मला भिन्न भिन्न वाटत होतीं. परंतु सार्वभौम सद्गुरुंच्या कृपाप्रसादानें मला सर्वाठिकाणीं ऐक्यच दिसूं लागलें आहे. सर्व व्रतें मीच होऊन बसलों आहे व मी स्वतःच गुरुलिंगजंगम झालों आहे. "

(टीप:- या पदामध्यें सर्व धर्माचे मूलतत्व एकच आहे असा मुख्य गर्भित सिद्धांत आहे.)

द ७ वें:- " हे परमेश्वरा, मला मनाच्या ओढींतून सोडीव. चांगल्या गोष्टी करूं जातां मला दुर्वासना आड येतात. काशीला निघालों तों दुर्गंधी गोष्टीकडे लक्ष जाऊन तुझा विसर पडला. गुरुचरणीं लीन न होता मन आडरानांत फिरते. म्हणून तूं माझ्या मनाचा पीळ उकल.

पद ८ वें:— " चिंता कां करतोस ? सर्व कांहीं करणारा शिवच आहे. पाण्यामध्यें उत्पत्ति कोण करतो ? मागें तुझें रक्षण कोणी केलें ? पुढें तुझा संहार करणारा कोण ? मागें अनंतकाल व पुढें अनंतकाल राहाणारा एक शिवच आहे. आकाशास टेकूं कोण देतो ? रविशशी कोणाच्या प्रेरणेनें आकाशांत चालतात ? गुरुलिंग-जंगम व सर्वेश असा शिव, एकच आहेत. "

पद ९ वें:— अंत:करण हा एक कठीण धोंडा आहे. ज्ञात्याकडून तो मऊ करा-वयाची **कला** शीक. मग तो खडीसाखरेप्रमाणें गोड होईल. अंत:करण मऊ केलें म्हणजे तुला नामामृत मिळेल व ज्ञानज्योति तुझ्या अंत:करणांत भरून राहील. तुझ्या अंत:करणरूपी दगडांत परीस आहे. अल्लम् महाप्रभूनें दगडांतून पाणी काढलें. पाणी पाण्यांत मिसळल्यावर भेदभाव

कोठें राहिला ? पुनः तुझा अंतःकरणरूपी दगड हा एक कल्पवृक्ष आहे. त्या खालीं बसून मागितलीं तीं फळें मिळतील यांत नवल काय ? गुळांत गोडी पुरून राहते त्याप्रमाणें गुरुलिंगजंगमाचा तूं एक गुणच होऊन रहा."

पद १० वें:- " तूं माझा सांगाती असतांना मी परदेशी कसा होईन ? तुला क्षय नाहीं. मला भय नाहीं. हे देवा, तूं माझेंच रूप आहेस. माझ्या मागें पुढें व डावी उजवीकडे रक्षण करणारा तुझ्यासारखा माझा स्वामी असतांना मी इच्छा करीन तीं फळें मिळतील यांत नवल तें काय ? ज्यांनीं या सद्गुरूची खूण पाहिली त्यांना हे विषय काय करणार ? "

पद ११ वें:- या पदांत पारमार्थिक अनुभवाला उत्तम खिरीची उपमा देऊन एका परंपरित रूपकानें संपूर्ण परमार्थाचें वर्णन केलें आहे.

" बारा सोळा जणी सुंदर स्त्रियां मिळून आम्हीं भात कांडू या. वेंवीचे उखळ व प्राणांचें मुसळ कर. विवेकानें तांदूळ पाखडून स्वच्छ करून, ज्ञानदृष्टीनें त्यातील खडे निवडून काढ. तीन वासनांच्या दगडाची चूल करून, त्यावर प्रारब्धाचें मडकें ठेव. खालीं काम, क्रोधरूपीं लाकडे घालून अग्नि तयार कर. चूल फुंकतांनां धूर लागू नये म्हणून, आंत बाहेर म्हणजे प्रपंच व परमार्थ दोनीकडे पहा. ही खीर उकळू लागली म्हणजे प्रथम मदाचा ऊत येतो. तो धैर्याचा पळीनें ढवळून आंत जिरवून टाक. प्रारब्धाच्या योगानें खीर चांगली तयार झाली म्हणजे सद्गुरूंनां पाहुणें बोलावून त्यांच्या संगतींत या खिरींचें सेवन कर. "

पद १२ वें:– पूर्वीं किंवा आतां व केव्हांहि, देवा, मी तुला सोडून नाहीं. तूं निराकार तर मी निर्विकार आहे. तूं पंचवदन

तर मी तुझें पादसेवन करणारा आहे. तूं विश्वंभर, तर मी विश्वामध्येंच आहे. तूं प्रणवस्वरूप तर मी त्याचा जप करणारा आहे. अशारीतीनें मी सदैव तुझ्या संगतीतच आहे. गुरुलिंगजंगम तूंच आहेस.

प्रस्तुतच्या ग्रंथ–रचनेच्या कामीं वेळोवेळीं ज्यांची अतीशय मदत झाली त्या श्रीयुत गणपतराव तुळपुळे, श्री. मनोहरपंत देशपांडे व श्री. नाना-साहेब हरीदास यांचे आम्हीं अंतःकरणपूर्वक उपकार मानतो. भक्तियुक्त आपुलकीच्या भावनेनें मुद्रणाचे काम उत्तमतऱ्हेनें व अल्पखर्चात केल्याबद्दल श्री गणपति संस्थान प्रेसचे व्यवस्थापक श्री. दादासाहेब देशपांडे, एम्. ए. यांचेहि मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. शेवटीं ज्यांच्या प्रेरणेनें हे कार्य शेवटास

गेले त्या श्रीसमर्थ सद्‌गुरूंच्या चरणीं अनन्यभावे वंदन करून ही लांबलेली प्रस्तावना संपवितो.

आपला,

प्रकाशक.

ॐ

बोध-सुधा

भाग १

आचरणाची मूलतत्त्वें

(१) उत्तम नरदेह.

हा दुर्लभ नरजन्म यापूर्वी अंडज, स्वेदज, जारज व उद्भिज या चार खाणींत, आणि चौऱ्यांशी लक्ष जीवयोनींत जन्मून या प्रत्येक योनींत कैक कोटि वेळ फिरून, तिथला गर्भ-वास भोगीत मनास येतील तशीं वाईट कृत्यें करीत, कसें करूं, कसें करूं या कासाविसींत, मरणाच्या वेळीं दुःख भोगीत, त्या त्या जन्मीं

दुसऱ्यावर अल्प उपकार केल्यामुळें हा नरजन्म सुदैवानें - आपल्या आचरणामुळें - लाभलेला आहे. यामुळें येथें देखील पुनः तसलीच दुष्कृत्यें करून, दुसऱ्यांच्या तीन गुणांची - कामिनी, कांचन व कीर्ति यांची अपेक्षा करून षड्विकारांना मोकाट सोडून; आत्म्याला न पाहतां हा दुर्लभ नरजन्म कासाविसींत व्यर्थ दवडला तर तो पुनः मिळणार नाहीं. म्हणून देहांत प्राण असेतो पर्यंतच याचें सार्थक करावें.

(२) जीवांच्या चार स्थिति-गति.

सर्व जीवांना चार स्थिति-गति असतात. बाल्य, तारुण्य, प्रौढपणा व वार्धक्य या

चार स्थिति – (दैहिक अवस्था) व भ्रम, भूल इच्छा, कासावीस या चार गति – (मानसिक अवस्था) होत. बाल्यावस्थेंत अज्ञानामुळें स्वतःचें व दुसऱ्याचें, चांगलें व वाईट, हा भेद समजत नाहीं. दहा बारा वर्षांचा झाल्यावर दुसऱ्याप्रमाणें आपल्यालाही बायको असावी अशा प्रकारचा लग्नाचा भ्रम म्हणजे हांव असते.

तारुण्यामध्यें, पूर्व अल्प सुकृतामुळें लग्न झाल्यानें, मनुष्याला बायकोची भुरळ (भूल) पडते. तो तिच्या सांगण्याप्रमाणें नाचतो. आईबापाला देखील कष्ट देण्यास तो मागेपुढें पहात नाहीं. हें फार वाईट. अशा पापी नराधमाला कधींही सुख लाभणार नाहीं.

प्रौढावस्थेंत त्याला संततीची प्रबळ इच्छा होते. व पूर्व सत्कर्मानुसार संतती झाल्यावर तो फार ताठरपणानें वागतो. पापपुण्याची त्याला फिकीर नसते.

वार्धक्यांत मी मेल्यावर माझ्या बायकापोरांचे काय होईल, या चिंतेंत तो सदैव असतो. वार्धक्य ही अत्यंत कठीण अवस्था आहे. येथें मागील पापांची झडती (न्यायनिर्णय) होते. शिवाय वार्धक्यांत मोह व स्वार्थ बळावत असल्यानें तो दुसऱ्यांच्या टीकेस पात्र होतो. म्हणून या अवस्थेंत अतीशय सावध असावें. नामस्मरण करून, आत्मज्ञान मिळवून, चौऱ्याऐंशी लक्ष योनींत फिरण्याचें चुकवावें.

(३) आचरणाचें बल व देवाचें बल.

आपलें आचरणच आपणास तारतें. करितां कोणाचा भरवसा किंचित देखील धरूं नये. त्याखेरीज आपणास दुसरा आधार नाहीं. देव, मनुष्याची पापपुण्याची तागडी घेऊन त्यांच्या अंतःकरणांतच सदैव असतो व (ज्याच्या त्याच्या कर्मानुसार फल देतो) जसें जोक येईल तसें फल देतो.

सर्व प्रापंचिक जन आपलें आचरण न सांभाळतां आलेल्या सुखदुःखाबद्दल देवाला नांवे ठेवतात. हें योग्य नव्हें. कारण आपलें आचरणच आपल्या सुखदुःखास कारण आहे, असें अनुभवानें समजते. करावे तसे भरावे हे

सत्य होय. चांगल्या आचरणानें राहिल्यास स्वप्नांत देखील वाईट होणार नाहीं. दुराचारी झाल्यास दुःख हें ठरलेलेच. याची आठवण ठेवून सदाचरणानेंच रहावें.

आपणास एकाद्या दुखण्यानें घेरले तर ते आपल्या दुराचरण मूलकच. साधा कांटा मोडण्याला देखील आपले दुराचरणच कारण होय. आपण सदाचरणी राहिलो तर कोणतीही बाधा, उपद्रव, आजार येणार नाहीं.

आचरणाच्या सामर्थ्यापेक्षां अधिक बल कोणाचेंही नाहीं. आपले बरे वाईट होणें आपल्या आचरणावर अवलंबून आहे. आपलें आचरण चांगले असल्यास प्रत्यक्ष ब्रह्मा,

विष्णु व महेश या तिघांनी मिळून त्रास देण्याचें मनांत आणले तरी ते होणे शक्य नाहीं. तेव्हां क्षुद्र मानवाची ती काय किंमत! आणि आपणच दुराचरणी झालो तर त्या तिघांनी मिळून कल्याण करण्याचें इच्छिलें तरी तें साध्य होणार नाहीं. आपल्या आचरणापेक्षां मोठें बल देवाचे देखील नाहीं. " मी केलेलें कर्मच जर प्रबल झालें, तर तूं तरी काय करणार " ? असें दासानी म्हटलें आहे. आचरण चांगले असेल तर देव आपला, नसेल तर तो आपले सर्व बिघडवतो. हें पूर्ण जाणून आपले आचरणास जपत असावें.

(४) बीजाप्रमाणें पीक.

चांगले अथवा वाईट करणें ही आपल्या

हातची गोष्ट आहे. जे बीज पेरावे तेंच उगवते. कडू जिरे पेरले तर कडू जिरेच येणार. गहूं पेरल्यास गहूं येणार. कडू जिरे पेरून गव्हांची अपेक्षा केल्यास ते कसें शक्य होईल ? म्हणून आपले आचरण संभाळून चांगलेच करीत रहावे.

मरगाईच्या दुखण्यानें (कॉलरा) पुष्कळ लोक मरतात. मरगाई म्हणजे देवाच्या हातांतील कोयता असल्याप्रमाणें, कापल्यास देवच त्यानें कापणार. तो नसतांना केवळ कोयता काय करूं शकेल ? सर्व देवाधीन आहे. सदाचरणानें देवाला आपलासा करून घेतल्यास मरगाई काय करणार ? हे जाणून

चांगल्या आचरणाने देवालाच वश करून घेतले पाहिजे.

(५) जसा ध्वनि तसा प्रतिध्वनि.

आपण दुसऱ्याशीं जसें वागतो तसें तें आपल्या बरोबर वागतात. त्यांचेवर प्रेम केलें तर तें आमच्यावर प्रेम करतात. रागावल्यास रागावतात, गर्व केल्यास, गर्व करतात. अलक्ष केल्यास, अलक्ष करतात; मान दिल्यास, मान देतात; अपमान केल्यास, अपमान करतात. आपण कपट केले तर तेही आपल्याशी कपटच करतात. ज्या त्या खात्यांत खर्च पडत असतो.

दुसऱ्यास आपण जे देतो तेच आपल्याला परत मिळत असतें. दुसऱ्यास सुख दिले तर

आपल्यालाही सुख मिळते. व दुःख दिले तर दुःखच आपल्याला भोगावे लागणार. कारण सर्वान्तर्यामी एकच आत्मा आहे. म्हणून आपण जसें करूं तसें तो आपल्यास देईल यांत शंका नको.

(६) पावलोपावली आचरणाचे परीक्षण.

आपण सदा सर्वत्र आपल्या आचरणाचें परीक्षण करीत असावें. एकादा काटा मोडला तरी तो कां मोडला, मजकडून कोणती चूक झाली. आचरण कोठें चुकतें वगैरे त्यांच क्षणी विचारपूर्वक निर्णय लावून मनाला रागें भरीत असावें व आचरण शुद्ध ठेवावे व असें पावलो पावलीं पाहात असावें. म्हणजे आपणांस

कोणतेही दुखणें येणार नाहीं व अपाय होणार नाहीं.

(७) बोलावे तसें चालावें.

'नडि नुडि इदे जन्म कडि' (चाल आणि बोल हांच जन्माचा शेवट) 'नडी' म्हणजे आचरण शुद्ध ठेवणें. 'नुडि' म्हणजे सद्-गुरूंची आज्ञा पाळणें. मागील साधू सिद्धानीं असें लिहून ठेवलें आहे, ते मनन करून तसें आचरण ठेवल्यास हाच नर-जन्म शेवटचा असा ठरेल. यापुढें या जीवाला दुसरा जन्म येणार नाहीं. कारण तो आत्म्यामध्यें मिळून जाईल.

(८) तूंच शिव आहेस.

संकट आलेले वेळीं ‘ देवा ’ आमचे चांगले कर. कोणाच्या हातांत कांहीं नाहीं. तूंच कल्याण कर. अशी देवाला प्रार्थना करतात. याचा अर्थ तूंच शिव आहेस. तूं करशील तसे बरें वाईट होतें. तुझ्या शिवाय दुसऱ्या कोणाच्या हातांत कांहींही नाहीं. तूंच चांगले कर असें आपण आपल्याला प्रार्थना करीत असावें.

भाग २

दुर्गुण-त्याग.

(९) कामिनी, कांचन आणि माती.

सर्व लोक तीन गुणांच्या जाळ्यांत सांपडलेले आहेत. ते गुण कोणते म्हणाल तर–कामिनी, कांचन आणि शेतवाडी व घरदार (स्थावर मिळकत). हे तीन देवानें आपल्याला दिले असतात. ह्यांतच आमरण आपण निरंतर सुखांत असावे.

आपल्या जवळ असलेल्यांना (गुणांना) तुच्छ लेखून म्हणजे ते नाहींतसे समजून, अहोरात्र दुसऱ्यांच्या गुणांकडे आशाळभूत-

पणानें पाहूं नये व त्यांची अपेक्षा करूं नये. पाहिल्यास डोळे बाटतील व दग्ध होतील. अपेक्षिल्यास मन दग्ध होईल.

हेंच आपले शत्रु होत. त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागल्यास ते आमचे घात करतील. त्यांना सलगी देऊ नये.

आपलें मन फारच ऐकेनासे झाले तर आपण देवाला मागावें. परंतु दुसऱ्याची वस्तू अपेक्षूं नये. परक्याचें द्रव्य व शेतवाडी व घरदार महारामांगाच्या नरकाप्रमाणें मानून देवानें दिलेल्यांत संतोषानें रहावें.

(१०) परस्त्रीच्या संगानें अघोर नरकप्राप्ती.

परस्त्रीचा संग प्राण गेला तरी करूं नये.

या जार कर्मानें द्रव्य, आयुष्य, शरीर व अन्न या सर्वांचा नाश होतो. यामुळें मुख्य जीवनाचाच नाश होतो. या पापामुळें संसारांत अपाय होऊन याला (अशा प्राण्याला) मुक्ति देखील मिळत नाहीं. यामुळें अघोर असा नरक प्राप्त होतो.

असे लोक पृथ्वीवर असल्यास ते ' भुईला भार व अन्नाला काळ ' बनतात. अशांचा भार पृथ्वी सहन करूं शकत नाहीं.

करितां, सज्जनांनीं परस्त्रीला आपल्या मातेसमान लेखत असावे. म्हणजे संसारीं सुख मिळून सद्गुरूस शरण गेल्यास यांना मुक्ति देखील मिळते.

(११) राग हा अस्पृश्य आहे.

राग हा महार होय. त्याला शिवून घेऊ नये. रागामुळें ज्या घरीं सदैव किरकिर असते, तेथें दारिद्य येण्यास विलंब लागत नाहीं. असे लोक कोणालाही आवडत नाहींत. यांना कोणीही उत्तम म्हणणार नाहींत, यांना ते छी थू, करतील.

या कारणानें राग आल्यावेळीं त्याल विवेकानें सोडावें व मनाला छी, थू करीत असावे. रागाला अगदीं मोडून टाकावे. (त्याला बिलकूल थारा देऊ नये).

परन्तु शहाणपणा शिकवण्याकरितां लहानावर रागावल्यास चालेल. पण त्यानीं केवढी

मोठी चूक केली तरी त्यांना तोंडानें रागे भरावें, हातानें रागावूं नयें (मारू नये) तसे केल्यास भलता परिणाम होईल.

(१२) गर्वाचा परिणाम.

मनुष्याला गर्व फार असतो. तो फार वाईट गर्वाला मूळच नाहीं. त्यामुळें अपराध फार. गर्वानें लोक इतरांना उद्धटपणानें बोलतात. मारहाण करतात. त्यांच्या अंगावर जाऊन त्याला तोंडाला येईल तसें बोलतात. (शिव्या देतात.)

त्यांना थोर लहान यांचीं जाणींव असत नाहीं. कोणाशी कसें बोलावें हें गर्वामुळें त्यांना समजत नाहीं. आपल्यावर कोणी उपकार

केलें आहेत याची जाणीव त्यांना असत नाहीं. गर्वाच्या योगानें ते पीठ-माती समान करतात. (लेखतात.)

गर्वामुळें माणसानें केलेल्या अपराधाचें भोग त्याला सुटत नाहींत. हा ज्याप्रमाणें इतरांवर गर्व करतो त्याप्रमाणें इतर याच्या-वर गर्व करतात. त्याच्याशीं गर्वानें वागतात. त्याला बोलवत देखील नाहींत. त्याला एखाद्या जुन्या वहाणें प्रमाणें लेखतात. त्यानें बोलावले तरी ते त्याच्याशी बोलत नाहींत.

ज्यामुळें गर्व आलेला असतो त्या वस्तूंचा विनाशकाल आला असे समजावें. कामिनी कांचन–कीर्ति–मुलें–धन–विद्या–शक्ति इत्या.

दिकामुळें गर्व आला तर ते सर्व जातील. (नाहींसें होतील) आपल्याला नसल्याप्रमाणें होतील, राजाला गर्व आल्यास राज्य जाईल. गरीबाला गर्व आल्यास त्याला भिक्षा देखील मिळणार नाहीं. याप्रमाणें आपण गर्व केला तर देव आपली मस्ती जिरवितो.

याप्रमाणें निर्गुणांतही (परमार्थांतहि) सहसा गर्व करूं नये. त्यामुळें (आपणाला दिसणारी) वस्तू कमी होते. तिला घालवून घेण्यास कबूल असणारानीं गर्व करावा.

करितां गर्व आल्यावेळीं आपल्यापेक्षां जे थोर आहेत त्यांचा दाखला घ्यावा. एवढे असलेल्यांना गर्व नाहीं. मला कां गर्व

(असावा) असें (मनाला) सांगून, त्याच प्रमाणें ज्याकरितां गर्व येईल ते टिकणार नाहीं म्हणून भिवून, गर्वाचा अंकुर देखील येऊं देऊं नये. आल्यास त्या क्षणीच तो मोडून टाकावा. देवानी दिलेली वस्तु झाकून खावी. (उपभोगावी). झाकूव ठेऊन संतोषानें असावे.

(१३) जळफळणारांना अन्न मिळणार नाहीं.

दुसऱ्यांची संतति, संपत्ति, मोठें काम इत्यादि चांगल्या गोष्टी पाहून, तें सहन न होऊन, (मनांत) झुरूं नये, जळफळूं नये " जळफळणाऱ्यास अन्न मिळणार नाहीं' झुरणारास मुले होणार नाहींत."

दुसऱ्याचे वाईट होवो, असें मनांत कधीही आणूं नये. आणल्यास आपलेच वाईट होतें. कारण सर्वांठायीं आत्मा एकच आहे. त्यामुळें आपण दुसऱ्याचे चांगले इच्छित जावें. म्हणजे आपल्या आचरणाच्या बला-प्रमाणें देव आपणास ऐश्वर्य देतो.

(१४) दंभ.

आंत विषयाचें ध्यान करीत बाहेर आत्म्याचें ध्यान केल्यासारखे दाखविणें हा दंभ होय. कारण देव सर्वसाक्षी–सर्वांतर्यामी आहे. त्याला सर्व कांहीं समजते. त्यामुळें दंभ करून त्याची वंचना कधीही करूं नये.

(१५) कपट वाईट आहे.

कोणाशीही सहसा कपट करूं नये. कपट फार वाईट. ज्याच्या करितां आपण दुसऱ्याशीं कपट करू ते काम होणार नाहीं. विश्वास देऊन दुसऱ्याचा घात कदापी करूं नये.

कपटानें आपण दुसऱ्याचें द्रव्य इत्यादि घेतल्यास आपलेंही कपटानें जातें. आपला हात दग्ध होतो. त्या हातानें पेरलेले बी उगवणार नाहीं. पीक येणार नाहीं.

दुसऱ्याचे द्रव्य घेतांना वरें दिसते. (वाटते). पुढें मागील अल्पपुण्य संपल्यानंतर एका क्षणांत ते जसे आलेले असते, तसें जाते. ते (कदापी) राहू शकणार नाहीं.

(१६) मोहाचा पाश.

माया म्हणजे बायको, मुलें, नातवंडे. हे आपल्याला मोहांत पाडतात. आपल्या मुलांवर अति माया करूं नये. त्यांना अन्न वस्त्राची उणीव पडू देऊं नये. (पण) त्यांना परक्यांच्या मुलांप्रमाणें लेखत असावें. स्वार्थ-बुद्धीनें फार माया केल्यास ती मुलांना बाधक झाल्याखेरीज रहाणार नाहीं. मोहानें आपण त्यांच्या आहारी (जाळयांत) जाऊन ज्यांचे भोग भोगत बसूं नये.

आपलीं माया आपणास बंधन करते. बांधून जाळयांत लोळवते. तिच्या बरोबर झगडून तिच्यापासून सोडवणूक करून

घेतली पाहिजे. ती ज्या ज्या वेळीं येईल त्या त्या वेळीं मनाला छी थू करून (बोध करून) नित्य सर्व प्रकारचा मोह मोडून टाकावा. (घालवून टाकावा) हाच नित्य होम होय. याप्रमाणें आपल्या सर्व दुर्गुणांचा होम केल्यास मोठे पुण्य (लाभेल).

(१७) अन्यायाचें अनाहूत.

एखाद्या कामांत अन्यायानें वागल्यास आपलें हीत व न्यायानें वागल्यास, आपले फार नुकसान झाल्यासारखे वाटते.

परंतु तशाप्रसंगी न्याय सोडू नये. सदा चरण चुकवू नये. हे नुकसान डोळ्याला दिसते. आपण आपले आचरण राखल्याकारणानें,

अंतरसाक्ष असलेला अंतरात्मा ते दृश्य नुकसान भरून देतो. परंतु अन्याय झाल्यामुळें आचरण चुकल्याकारणानें न दिसतां झालेले नुकसान– म्हणजे प्रौढपणीं बायको व वृद्धापकाळीं मुलें मरून झालेले नुकसान,– मनाला सहन करवणार नाहीं.

या कारणानें मनाला सांगावे, किं दिसणारे नुकसान पुरवले न दिसणारे नुकसान सहन करणें कठीण. परके काय नुकसान करतात ? आपले आचरण चांगले असल्यास, नुकसान झाले तरी, ते एक विघ्न टळले असे समजावे. परक्याचा मार सहन करवेल, परंतु आत्म्याचा टोला सहन करवणार नाहीं.

(१८) पापाला साजेशी शिक्षा.

आपण जाणून बुजून पाप करू नये. आपणास त्याचा तिटकारा यावा. नकळत झालेल्या पापामुळें न कळत कोणते तरी नुकसान होतें. कळून सवरून पाप केल्यास तितकीच शिक्षा होतें.

कसे तर, शेतांतील एकादी काकडी चोरली तर ते पाहून रागें भरतात, अगर मारतात, परन्तु एकाद्याचे घर फोडले, एकाद्याचा खून केला, तर मारहाण करून, बेड्या घालतात, अगर जन्मठेपेची शिक्षा देतात.

१९. शिक्षेचे तीन प्रकार.

नीतीला सोडून वागल्यास तीन प्रकारच्या

शिक्षा मिळतात- अधिभूत, अध्यात्म अधिदैव- हेच ते तीन प्रकार होत.

त्यांत आधिभूत म्हणजे, लोक ज्या तऱ्हेचे पाप करतात त्याबरहुकूम परक्याकडून मार मिळून, सरकार सजा होऊन, पशुपक्षी चावून महाभूतांचा तडाखा बसून, शरीरांस दुःख होणें.

अध्यात्म म्हणजें आपल्या आत्म्याला (मनाला) दुःख होणें. विविध प्रकारची दुखणीं येऊन शरीराला व मनाला दुःख होणें.

अधिदैव म्हणजे पुढें मेल्यानंतर यमधर्माची शिक्षा होणें, या तीनही प्रकारच्या शिक्षांचा विचार करून, पापाचा तिटकारा यावा.

(२०) चोरून काम नको.

संसारांत चोरून कोणताही व्यवहार करूं

नये. दुसऱ्याची भीती वाटणार नाहीं अशा प्रकारें व्यवहार करावा. परंतु आपल्या स्वतःच्या संसारांत चोरून कराव्या लागणाऱ्या कामास भय नाहीं. त्याला परक्यांची भीती असत नाहीं, फक्त साधन मात्र चोरून करावें. त्याखेरीज इतर कोणतेंही चोरून करूं नये.

(२१) आळस हा मुख्य शत्रू होय.

आळस कोणीही करूं नये. कारण आळस हा एकटचा करणाऱ्याचाच घात न करतां त्याच्या कुटुंबियांचा देखील तो घात करतो. याला जे आश्रय देतात त्यांचा घात करणें हा त्यांचा धर्म आहे. त्यामुळें त्याच्या वाऱ्यासही उभे राहूं नये.

आळस परमार्थांतही घात करतो. कसे तर नाम घेत नामस्मरण करीत (बसल्यावेळीं) झोप येते व आळस स्थिरावतो. परंतु त्यावेळीं झोप आल्यासरशी तिला घालवून टाकावी. नाम घेत बसावें. असें दहा पंधरा दिवस केलें म्हणजे ती सोडून जाते. जें काम करतांना आळस येतो, तें काम त्या क्षणीं करावें.

(२२) चिंतेचें पीक.

चिंता ही फार वाईट आहे. तिचें पीक फार लवकर येतें. म्हणून ज्याक्षणीं चिंता येते त्या क्षणींच तिचे मोड खुडून टाकावे. मनाला बोध करून तिचा अंकूर देखील राहूं देऊं नये. "चिंता हें वार्धक्य, संतोष हें यौवन होय".

लोक जन्मल्यापासून मरेतोपर्यंत चिंता करतात. जसजशी चिंता करावी तसतशी ती वाढतच जाते. यांच्या चिंतेनें कांहींही होत नाहीं. देव जसें करावे तसेंच करतो (आपल्या मनाप्रमाणेंच करतो). हे उगीचच चिंता करून दमतात.

अगोदर आपल्या वस्तू जपाव्यात, गमावूं नयेत. गेल्यावर चिंता करूं नये. गेलें तें जाऊ दे. कोणते तरी संकट याच्यांवर गेलें. मोठें संकट लहानावर गेलें. आकाशाला आकाश लागलेलें आहे. कोठें गेलें तरी तें आकाशांच्या आवारांत (सीमेंत) असते. देव देण्यास समर्थ आहे. (आपले) आचरण जपल्यास कोठें कांहीं जाणार नाहीं. गेलेलें येईल. असें मनाला

समाधान करीत असावे.

(२३) निर्गुणाची चिंता.

साधकानीं गुणाविषयीं कोण त्याही प्रकारची चिंता न करतां, आपल्याला आत्मा कसा अधिक दिसेल, नामामृत कधी मिळेल. याची चिंता म्हणजे निर्गुणांची चिंता करीत असावी. यांनी आत्म्याची चिंता केली म्हणजे यांची चिंता आत्म्याला असते. तो यांना कशाचीही कमतरता पडू न देतां यांचा संसार चालवतो.

मनांतील चिंतेचा अंकुर मोडण्यास व मन शुद्ध करण्यास गुरुकृपेनें मिळालेलें नाम हें एकच साधन होय. नामस्मरणानें चिंता आपोआप नष्ट होतें. देव कृपा करतो.

(भाग ३)

सद्गुण—संपादन.

(२४) विवेक.

सर्व दुर्गुणावरोबर लढण्यास विवेक हेंच मोठें हत्यार आहे. विवेकाव्यतिरिक्त कोणतीही गोष्ट करूं नये. पुढच्यास ठेंच लागलेली पाहून आपण हुषारीनें करावें आणि समाधान व आत्मध्यान यांच्यायोगें सर्व वैऱ्यांना ठार करीत आवें.

(२५) चांगली बुद्धि.

आपणाला तारणें अगर मारणें हे आपल्या बुद्धिच्या हातीं आहे. चांगली बुद्धि तारते व वाईट बुद्धि मारते.

आत्म्याचें सतत अखंड ध्यान करणें हीच चांगली बुद्धि. आत्म्याला सोडून 'कसें करूं' अशी चिंता करणें हीच वाईट बुद्धि.

आपल्या जवळ धन इत्यादिकांचें पुष्कळ बळ असलें तरी तें ऐनप्रसंगीं आपल्या कामास येत नाहीं. चांगली बुद्धि मात्र आपणास तारते. या कारणानें आपण नेहमीं चांगली बुद्धि दे, अशी आत्म्यास प्रार्थना करावी.

(२६) इंद्रिय निग्रह.

इंद्रियें दहाः पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें. आपल्या सर्व इंद्रियांवर आपली हुकमत असावी. ज्या ज्या इंद्रियांना जें जें हवें असते तें त्यांना देऊं नये. त्यांची गोष्ट कदापि ऐकूं

नये. ती मोडून टाकावी. सर्व इंद्रियांना आत्म्याच्या कामास, सेवेस लावल्या वेळींच ती आम्हास वश होतात.

याप्रमाणें त्यांना आपल्या स्वाधीन ठेवलेले इसमच धीर–साधु सिद्ध होत. त्यांनीं नर-जन्मास येवून सार्थक केले. या करतांच नरजन्मास यावें.

(२७) प्रथम कामास ठार करावें.

काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, अहंकार हे सहा विकार शरीरांत आहेत. आत्मा चौऱ्याऐंशी फेऱ्यांत पडण्यास हे विकारच कारण होत.

या विकारांना वाढूं देऊ नये. याकरितां प्रथम कामाला ठार करावें. कोणतीही गोष्ट मला कशाला हवी ? मला कांहींही नको. या विचारानें वेळोवेळीं मनाची हांव मोडून ताकीत असावे म्हणजे क्रोध येणार नाहीं. आपण परक्याच्या वस्तू अपेक्षिल्यास त्यांनीं त्या न दिल्या कारणानें आपणांला राग येतो. अपेक्षाच केली नाहीं तर राग येण्यास मार्ग नाहीं. या दोघांना (काम, क्रोध) ठार केल्यास इतर विकार येणार नाहींत.

मन विकारवश झाल्यास प्रथम शरीर दृढ धरावें. ' मन गया जाने दो । मत जाने दो शरीर ॥ म्हणजे शरीरास मनाच्या मागे जाऊं देऊं नये.

परंतु मनानें विकारांना नच सोडल्यास त्याला साधनानें निश्चल करून हातीं घ्यावें. बुद्धीनें मनाला बोध करून, विकारावर नित्य राग धरून साधन करावें.

उत्तम लोकांनीं विकाररहित असावे. कारण मरणसमयीं एखाद्यावर लोभ अगर क्षोभ राहिला, तर त्यामुळें त्यांना पुनर्जन्म मिळतो. (घ्यावा लागतो)

(२८) ओझें घालूं नये.

इतरांवर कोणत्याही प्रकारचें ओझें घालूं नये. संसाराचें ओझे घातल्यास आपल्या संसारावर ओझें पडतें. शरीराचें ओझें घातल्यास आपल्या शरीरांवर ओझें पडतें व तें

जड होतें. आपण ज्या प्रकारचें ओझें घालतो त्याप्रकारचे ओझें आपल्यावर पडतें यांत संशय नाहीं.

(२९) हात खाली करूं नये.

कोणापुढेंही आपला हात खाली करू नये. खाली करून इतरांकडून कांहीं तरी घेतल्यास तें आपणास पुरणार नाहीं. इतकेंच नव्हें तर त्यामुळें आपला हात दग्ध होईल. करितां आपला हात वर असावा.

वैदिक जंगमादि लोक दुसऱ्यांच्या वस्तूंची अपेक्षा करून आपला हात खाली करून, तो दग्ध करून घेतात. त्यामुळें त्यांच्या कामास यश येत नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या

संसारासही त्या वस्तू न पुरून त्यांचें दारिद्रय कांहीं कमी होत नाहीं. म्हणून कोणाचेही दान धर्म इत्यादि स्वीकारूं नये. शक्यतो आपणच इतरांना देत असावे.

(३०) सहनशीलता.

इतरांनीं शिव्या देण्याजोगें आपण कांहींही करूं नये. त्यांनीं अन्यायानें शिव्या दिल्या अगर मारले तर आपण फिरून शिव्या देऊं नये, मारू नये. अगर त्यांच्यावरील आपले प्रेम कमी होऊं देऊं नये.

कारण अन्याय केलेल्या लोकांनीं विष खाल्लेले असते. पुढें ते त्यांच्या अंगीं भिनून ते मरतात. कारण आपल्या संसारांत ह्यांनीं

इतरांवर अन्याय केल्यामुळें. कोणत्यातरी प्रकारानें देव त्यांच्यावर अन्याय करतो.

आपल्यापेक्षां अधिक थोर अगर जबरदस्त व्यक्तीनीं आपणाला शिव्या दिल्यास उगी रहावे. लहानांनी विनाकारण शिव्या दिल्या तरी त्या देखील मुकाट्यानें सहन कराव्या. आपण एकादी चूक केली तर इतर लोक आपल्यास बोलतात. ते बोल आपल्या शहाणपणाकरितां होत, असें समजून आपण त्यांचे उपकार मानावेत. रागावून सांगणारे आपले हितकर्ते व हांसत सांगणारे आपले अहितकर्ते होत. "जितके सहन तितके जीवन"

म्हणजे सहन केल्या फळचें तेव्हांच मिळतें.

शांति सुख चुकत नाहीं. सहन करणाराच अधिक वेळ जगूं शकतो.

ताप सहन करणें म्हणजेच तप. झालेला ताप आपण गिळून टाकावा. कोण कांहींही बोलो त्यामुळें आपल्या समाधानास भंग येऊं देऊं नये. आपण समाधानाचा समुद्र असावे. शांत असलेलेच संत होत.

इतरांचा भार सर्व प्रकारें सहन करण्यांतच आपले हित. किंचित सहन केलें म्हणजे पुढें येणारी असंख्य दुःखे नाहींशी होतात म्हणून हा फायद्याचा व्यापार करावा. थोडी किंमत देऊन स्वस्ताईनें आत्म्याकडून अधिक पदार्थ घ्यावेत. सहिष्णुता हीच किंमत देणें आपणास होणारे सुख हेंच पदार्थ होय.

(३१) मनास दुखवूं नये.

दुसऱ्याचें मन कोणत्याही प्रकारें दुखवूं नये. त्यांना कोणत्याही प्रकारें दुःख देऊं नये उपद्रव देऊं नये. त्यांची अपेक्षा मोडूं नये.

कोणत्याही कामांत ते हळहळतील असें करूं नये. व्यापारांत वचन दिल्यानें इतरांना तोटा होत असल्यास तो व्यापारच सोडून देऊन त्यांना संतोष द्यावा. शेतांत, घरीं अगर इतर ठिकाणीं मजुरीचे गडी कामास लावले कीं फसवून त्यांना कमी पगार देऊं नये.

एखादे घर बांधावयाचे झाल्यास कोणताही अन्याय करूं नये. जागा साधून घेऊं नये. (दुसऱ्याच्या जागेंवर अतिक्रमण करूं नये) व त्याना हळहळ वाटूं देऊं नये. लाकूड वगैरे

सामान पैसा देऊन संतोषानें विकत घ्यावें. दुसऱ्यांना दुःख देऊन घर बांधलें तर आपणाला तेथें असेतोपर्यंत दुःखच होईल. संतोषानें बांधल्यास संतोष होईल.

(३२) सत्य-असत्य.

खोटें कधीहि बोलू नये, खरेंच बोलत असावें. म्हणजे आपले बोलणें कधींहि खोटें होणार नाहीं. आपण खोटें बोलल्यास आपण बोललेलें सर्व खोटें होईल. खरे बोलल्यास बोलणें सर्व खरें होईल.

आपल्या अंगावर कोणताही प्रसंग आला तरी आपण खोटें बोलू नये. खोटें बोलण्यानें तो जाईलसे वाटते. परंतु तो अधिकच अंगा-

वर येतो. प्रसंग अंगावर येवो अगर न येवो, आपण कदापि खोटें बोलूं नये.

खरें बोलल्यामुळें घरदार, धनदौलत, सर्व कांहीं गेलीं तरी जावो. देणारा देवकांहीं गरीब नाहीं. तो समर्थ आहे, तो देईल तेंच पुरेल, लोक कितीसें देतील ?

खोटें बोलून जगण्यापेक्षां खरें बोलून मरणें बरें ? प्राण गेला तरी आपण खोटें बोलणार नाहीं, असा आपण नेम करावा (निश्चय करावा) म्हणजे आपल्या कामांत देव आपणाला सहाय करतो.

परंतु यांतही विवेक करावा. एकाद्यास गोष्टीनें इतरांचें कल्याण होत असल्या

अशा वेळीं आपला तोटा होणार असला तरी खोटें बोलावें. इतरांचा प्राण जात असल्यास आपणाला अपाय होत असला तरी खोटें बोलून आपण त्याचा प्राण वांचवावा.

याविषयी एक जुनी कथा आहे. एकदां एका ब्राह्मणानें आपल्या बायकोस मारले. त्यामुळें ती मरण पावली. हें श्री कबीरदास महाराजांनीं पाहिलें होतें, त्यायोगें त्यांची साक्ष दिली गेली. तेव्हां 'मी खरें सांगितलें तर ब्राह्मणाचा प्राण जाईल, खोटें सांगितलें तर माझ्या साधुत्वास कळंक लागेल' (आतां काय करावें) असा त्यांनीं विचार केला. व विवेकानें काय करावें तें जाणलें. आत्म्याचें ध्यान करीत ते कचेरीस गेले. आणि तो

जिकडे दिसत होता तिकडे तोंड वळवून उभे राहिले. हें पाहून ते वेडे आहेत असें न्यायाधीशांना वाटलें. आणि त्यांनीं महाराजांना सरळ उभे राहण्यास कळवलें. नंतर घडलेली हकीगत सांगण्यास आज्ञा केली. तेव्हां महाराज म्हणाले– 'देखनेवाला बोलता नहीं । बोलनेवाला देखा नहीं ।' हें उत्तर ऐकून न्यायाधीशाची हा खराच वेडा आहे अशी खात्री झाली आणि पुरावा नसल्यामुळें त्या ब्राह्मणाची सुटका झाली. त्याचें प्राण वाचलें.

याप्रमाणें दुसऱ्यांच्या हिताकरितां एकाद्या-वेळीं विवेकानें खोटे बोलल्यास चालेल. परंतु आपल्या स्वार्थाकरतां केव्हांही खोटे बोलतां

कामा नये.

(३३) थोरांची सेवा.

वृद्धापकाळीं आपलें पालनपोषण करावें या उद्देशानें आईबापांनीं मुलांना लहानाचे मोठें केलेले असते. करितां वडिलांना संतोष देऊनत्यांची आज्ञा न उल्लंघिता त्यांचें मन न मोडतां त्यांची सेवा करावी.

संतुष्ट होऊन त्यांनीं आशीर्वाददिला तर यांचें कल्याण होईल. वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वागून त्यांच्या सेवेंत तत्पर असलेल्यांना संतति, संपत्ति, आयुष्य, बळ व कीर्ति इत्यादि प्राप्त होतात.

आपल्यावर सर्वांनीं प्रेम करावें असें

ज्यांच्या मनांत आहे त्यांनीं 'करणी' करावी. 'करणी' खेरीज अंतःकरण मिळणार नाहीं. "करणी' करणें म्हणजे त्यांनीं सांगितलेल्या कामांत तयार असणें. सांगण्यापूर्वीच आपण तें काम करावें. त्यांच्या हातांतील काम आपण घेऊन तें आपलेंच काम आहे असें समजून, मन लावून न बिघडवितां त्यांच्यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेनें करून दाखवावें. उच्चकामापेक्षां नीच कामानें त्यांचें प्रेम आपल्यावर फार लवकर बसतें. नीच काम म्हणजे पाणी आणणें, धोतर धुणें इत्यादि कोणीही सहसा करणार नाहीं असें काम. फार प्रेम हवें असल्यास हीं कामें करावींत.

याप्रकारें आपल्या शक्त्यनुसार शरीरानें

मनानें अगर धनानें आपण 'करणी' म्हणजे सेवा करावी म्हणजे त्यांचें प्रेम आपणास मिळेल. असलेली ममता वाढेल यांत संशय नाहीं.

(३४) आपल्याप्रमाणें इतरांना लेखणें.

आपल्याप्रमाणें इतरांना लेखावें, इतरांचे दुःख हें आपलें दुःख असें जाणावें. आपलें शेत दुसऱ्यांनीं चोरल्यावेळीं आपणाला जसें दुःख होतें तसेंच दुसऱ्याचें शेत आपण चोरले तर त्याना होतें असें समजावें. आपल्याप्रमाणें इतरांच्या मुलांना लेखावें. एकादे वेळीं आपल्या मुलापेक्षां इतरांचीं मुलें श्रेष्ठ होत असे जाणल्यासही हरकत नाहीं. म्हणजे देव

नारजन्मांत निद्रा, आलस्य इत्यादिकांना सोडून, कामिनी, कांचन-कीर्ति या गुणां-बरोबर लढून, सद्गुरूंना शरण जाऊन, अहोरात्र आपलें आचरण संरक्षून, आत्म्याचें प्रेम संपादून, जन्ममरणाचा फेरा चुकवून, सुखांत असावें वरें !

(४८) सद्गुरूंची प्राप्ति.

गुप्त रूपांशीं ऐक्य पावलेल्या महात्म्या-लाच 'सद्गुरु' ही संज्ञा प्राप्त होते. असे सद्गुरू भेटणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हें. मिळाले तरी त्यांच्याकडून नाम मिळणें फार कठीण. हल्लीं सर्व लोकांना कशाचीही परवा

नाहीं. तद्वत संसारांत एक दिवस देखील सुख मिळत नाहीं. सारखें दुःख वाढत असतें.

(४७) मनाला बोध.

म्हणून मनाला असा बोध करावा कीं 'बा मना ! मागें चौऱ्याऐंशी योनींत जन्मून त्यांचीं दुःखें भोगत, सर्व जन्मांमध्यें प्रपंच करून, आत्म्याला न जाणतां, मन मानेल तसें नाचलास. त्याचप्रमाणें खाणें–पिणें निद्रा–आळस इत्यादि करीत आलास. लग्न करून मन मानेल तसें रतिकर्म करून मुलांना जन्म दिलेस. नसतीं दुष्कृत्यें करून द्रव्य मिळविलेस व मरत उपजत आलास. (जन्ममरणाच्या फेऱ्यांत फिरत आलास). परंतु या उत्तम

(भाग ४)

परमार्थ—मार्ग

(४६) संसारांत सुख नाहीं.

संसार हा पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें आहे. कोणत्या वेळीं काय होईल समजत नाहीं. कशाचाही भरंवसा धरतां येत नाहीं. करितां आत्म्याला सोडून संसारांत सुख शोधणें हें 'मृगजलानें भात व केळी पिकवण्या-प्रमाणें' होईल. मृग-जल हें खोटें असल्यानें त्याच्यापासून फळें कशी पिकतील ?

संसार अवसाचें पेव असल्याप्रमाणें आहे. त्यांत उतरल्यानंतर त्याचा तळ जसा लागत

तील अविनाश सुख. या राज्यांत कोणत्याहि गोष्टीची उणीव पडणार नाहीं. यांत दुःखाचा स्पर्श नसलेलें सुख वाढतच जातें.

अंतर्युद्ध जिंकल्यास इहलोकीचें सर्व सुख आपलेंच. त्याच्या सुखास सीमा नाहीं. याप्रमाणें युद्धांत जय मिळाला तर इहसुख; मरण आलें तर मुक्तिसुख. रणांगणांत मेल्यास मुक्ति मिळते असे जे म्हणतात, ते या रणांगणांत मेल्यास, या युद्धांत जिंकिल्यास, स्वराज्य सहित मुक्ति मिळते.— मेल्यास केवळ मुक्ति मिळते.

अशा प्रकारें सर्वांनीं युद्ध करून स्वराज्य मिळवून, मुक्त व्हावें.

तीन गुण, सहा विकार, दहा इंद्रियें आडवे येऊन असलेल्या आत्म्यास वाढूं देत नाहींत. करितां अहोरात्र त्यांच्याशीं झगडा करून, प्रतिनित्य एकेकांना ठार करीत सर्व वैऱ्यांना मारून टाकावें.

याप्रकारें आपल्या दुर्गुणाबरोबर लढून, सद्गुणांना हस्तगत करून घेऊन, आत्म्याचें प्रेम संपादून, सुखानें संसार करून मुक्त व्हावें.

त्या युद्धांत (बाह्ययुद्धांत) दोन्हीकडून नरक. येथें (अंतर्युद्धांत) दोनहीकडून मुक्ति. यांत संशय नाहीं.

(४५) स्वराज्य संपादन.

' स्वराज्य ' म्हणजे आपलें सुख आत्म्या-

सुख भोगतात तितकें दुःखही भोगतात, त्यांना दुःखाखेरीज सुख मिळत नाहीं.

अशांना संपत्ति आहे तर संतति नाहीं, संतति आहे तर संपत्ति नाहीं. एक आहे तर दुसरे नाहीं असे होऊन, सुखदुःख सारखें असतें.

परंतु ते रणांगणांत मेले तर त्यांना नरकप्राप्ति होते. जिंकिल्यास कांहीं काळ पापानें राज्य करून पुढें ते नरकास जातात. अशांना दोहीकडें नरकवास चुकत नाहीं.

(४४) अंतर्युद्धानेंच सुखप्राप्ति.

यामुळें अशा युद्धांत शिरून नरकाला न जातां, वेगळ्या प्रकाराचें उत्तम युद्ध करावें.

(४२) परमार्थांत बुडून जावें.

संसारांमध्यें सर्व प्रकारें खबरदारीनें वागून पुढें आपलीं मुलें संसार करण्यास लायक झाल्यानंतर, संसार त्यांच्या स्वाधीन करून, आपण परमार्थांत मग्न व्हावें. पुनः संसाराकडे पाहूं नये. संसार झाल्यानंतर मरेपर्यंत परमार्थ म्हणजे आत्मध्यान, करून आत्म्यांत मिळून जावें.

(४३) बाह्ययुद्धानें दुःखप्राप्तीच (व्हावयाची)

सामान्य प्राणी राजे लोकांबरोबर युद्ध करतात. त्या युद्धांत जयशाली झाल्यास ते राज्य करतात. तेवढ्या कामांत ते जितके

(४१) प्रपंचांत परमार्थ.

प्रपंचांत परमार्थ करावा. परमार्थ सोडून केवळ प्रपंचच करूं नये. सत्वगुणांच्या आधारानें संसारांत अहोरात्र परमार्थ वाढवीत असावा. संसाराचा मळ न लागतां पार होऊन जावें.

मुख्यत: परमार्थ साधणें हाच आपला धर्म होय. त्याला अनुकूल होतील तितकी व होतील अशा बेतानें सर्व कामें करून, कोणत्याही कामाची काळजी न करतां सर्व कांहीं आत्म्याच्या इच्छेप्रमाणें होऊं दे, असा निश्चय करून, आत्म्याचें ध्यान निरंतर न सोडतां करीत असावें.

काम इमानानें न करतां पगार घेतल्यास तो हात दग्ध होईल. सर्वांत अधिक श्रेष्ठ इमान म्हणजे सद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणें इंद्रिय-मनांना आत्म्याच्या कामीं लावणें.

(४०) विवेकानें वागणें.

संसारांमध्यें खबरदार असावें. आपण नित्य मिळवितो किती व खातो (खर्चतो) किती– म्हणजे नित्याची जमा किति व खर्च किती ? हें प्रतिनित्य पहात जावें.

विचारानें पाऊल ठेवत असावें. दानधर्म विचारानें करित जावा. कंजूषपणानें राहूं नये.

सर्व कामें विवेकानें करीत जावीं.

मोठ्या कामांत होत नाहीं. म्हणून नेमलेल्या-वेळीं आपलें काम करून, कोणीही नांवें न ठेवतील असें वागावें.

शरीर राबवून राबवून झिजवावें. शरीराला सुख देऊं नये. सेवकाप्रमाणें राबावें व राजाप्रमाणें जेवावें. म्हणजे शरीर राबून राबून क्षीण झालें तरी, व्यर्थ वेळ न घालवितां तें तें काम त्या त्या वेळीं करीत असावें.

आणि कोणतीही ददात न मानता ' काय करूं कसें करूं ' याचें स्मरण न करतां असेल त्यांत (सुखानें) जेवावें (असेल त्याचा सुखानें उपभोग घ्यावा).

राग येतो व तो याची मस्ती जिरवितो. या कारणानें देवानें आपणांस दिलेला उद्योग मन लावून करावा. म्हणजे देव संतुष्ट होतो.

(३९) उद्योग करण्याची रीत.

आपला रट्टा राबवून काम करावें व खावें. उगीच बसून कर्ज करून खावूं नये. हराम खावूं नये. हलाल खावें.

नोकरी मन लावून, आपुलकीच्या भावनेनें आळस, कपट न करतां, करीत दिवस घालवावेत. आपल्या श्रमानें पगार देणाऱ्यांना संतुष्ट केल्यास आपणाला सर्व कामांत यश येऊन त्यांत फायदा होत जातो.

लहान कामांत जेवढें सुख होतें, तेवढें

असलेल्याकडे दुर्लक्ष करून नसलेल्याची अपेक्षा करीत राहिल्यानें तें न मिळून असलेलेंही जाऊन " तेल नाहीं तूप नाहीं " या न्यायानें दोनीही नाहींसे होतात.

(३८) देवानें दिलेला उद्योग.

देवानें आपणाला जो उद्योग लावला आहे तो चांगल्या प्रकारें करावा. उत्तम शेत, मध्यम व्यापार, कनिष्ट चाकरी या तिहीपैकीं कोणतातरी एक उद्योग देवानें आपणांस दिलेला असतो.

दुसऱ्याच्या उद्योगाची आशा करून-असलेला उद्योग धिक्कारून- तो विगारीनें (वेठीनें) केल्यास, अंतरंगांतील आत्म्यास

भोजनास बसल्या वेळीं आपल्यांना अधिक वाढून परक्यांना निर्दयपणें कमी वाढतात. त्या पापामुळें स्वकीयांना इजा झाल्याखेरीज राहणार नाहीं.

आतां दुष्काळ पडल्यामुळें पुष्कळ लोक अन्नाच्या अभावी मरत आहेत. असे घोर प्रसंग लोक निर्दय झाल्याचें फल होय, यांत शंका नाहीं.

(३७) देवानें दिलेल्यांत समाधान.

देवानें आपणास पोट दिलें आहे. तोच कसेंही करून पोटास शेर (भाकरी) देतो. यास चुकत नाहीं. या कारणानें देवानें दिलेल्यांत सुखानें असावें. परक्यांची अपेक्षा करून दुःखीकष्टी होऊं नये.

सर्व शरीरांत असणारा आत्मा एकटाच आहे. इतरांच्यांत असलेला आत्मा आपल्यांतही आहे. यामुळें आपण इतरांवर निष्ठुर – निर्दय झालो तर ते आत्म्यावर झाल्याप्रमाणें होईल. आपण आत्म्यावर निष्ठुर – निर्दय झाल्यास तो आपणावर निष्ठुर – निर्दय होतो.

सर्व लोक स्वकीयांवर दया करून परकीयांवर निर्दय होतात. आपलीं जनावरें परक्याच्या शेतांत चारून, जनावरांवर दया करून शेतावर निर्दय होऊन, परक्याचें नुकसान करतात. आपण पाळलेल्या कुत्र्यांना, पक्षी मारून खावयाला घालतात. कुत्र्यावर दया करून पक्ष्यावर निर्दय होतात. आपलें व परकें मिळून

दंभानें कर्ज काढून अगर दुसऱ्याचें घर बुडवून आपण अधिक दानधर्म करूं नये. उपकाराकरितां आपण संकटांत पडूं नये. अनायासे होईल तितका उपकार करावा. यांत चुकूं नये. असलेल्यांत उपकार करून तो इतरांना सांगूं नये.

याप्रमाणें इतरांच्या हिताकरितां आपली काया झिजवून (शरीरास राबवून) आपल्या मागें आपलें नांव राहीलसे करावें.

(३६) दयेचें स्वरूप.

सर्व प्राण्यांवर दया असो द्यावी. कोणावरही निष्ठुर – निर्दय होऊं नये.

आपल्या मुलांवर प्रेम करतो. मानवानें किती प्रेम केलें तरी तें हीन होय. देवाचें प्रेमच खरें.

कोणत्याही विषयांत कृत्रिमपणा करूं नये. आपण ज्या गोष्टीकरतां कृत्रिमपणा करूं ती गोष्ट आपणांस न कळतांच नाहींशी होईल. याकरितां स्वकीय व परकीय एकच जाणून सर्वांना सारखें समजत जावें.

(३५) परोपकार.

शक्यतों दुसऱ्यावर उपकार करावा. देवानें दिलेल्यांत दानधर्म करीत असावें. मध्यान्ह-काळीं आलेल्यांना आपल्या येथें असलेल्यांतून अर्धी भाकर देऊन त्यांचा सन्मान करावा.

नाहीं. ते मनाला येईल तसें नाचतात-मरतात-व पुढें सर्व जन्मांतून फिरतात.

यायोगें सर्व लोक जीं कृत्यें करतात. तींच आपणही न करतां, सद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणें वागून, ध्यान करून, प्रकाश पाहिला तर या जन्मास आल्याचें सार्थक होईल.

(४९) हातानें काम-मनानें ध्यान.

सद्गुरूंचें प्रेम संपादून, हातानें काम करीत, मनानें नाम स्मरत असावें. " करसे काम करो, हरी सो ध्यान धरो। मकडीके जालमें तंता । चढते उतरते दमकी खबर रखो ॥

संसारामध्यें मजूराप्रमाणें असावें. तो जसें आपल्या मजूरीवर लक्ष ठेवून काम करतो,

तद्वत मजूरीकरितां म्हणजे कुटुंबियांच्या अन्नवस्त्रापुरतें, मिळविण्याकरितां, हातीं घेतलेलें काम चांगलें करावें.

परंतु सर्वकाळ आत्मध्यान करत असावें. केवळ शरीर कामाकडे लावावें, व चित्त आणि प्राण आत्म्याकडे ठेवावे.

(५०) संसारांत उदास, परमार्थांत उल्हास.

वृत्तीविषयीं – म्हणजे संसारांतील पैसा, गुरेढोरें–घरदार– इत्यादिकाविषयीं उदासीन असावें. संसार दुसऱ्याचा आहे असें जाणून असावें. परन्तु त्यांत कसली कमतरता राहूं देऊं नये.

निवृत्तींत म्हणजे परमार्थांत उल्हास असावा. परमार्थ सदैव उल्हासानें चालवावा.

परमार्थ हेंच आपलें मुख्य काम असें समजून हातानें काम करीत, मनानें नाम घेत असावें.

(५१) नेणीव सोडून जाणीवेंत रहाणें.

जाणीव म्हणजे आत्मस्मरण. नेणीव म्हणजे त्याचें विस्मरण.

स्मरणानें सर्व कामें अनायासें शुद्ध व चांगली होतात. असाध्य तें साध्य होतें. विस्मरणानें चांगलें तें वाईट होतें. अपेक्षिलेलें, केलेलें, सांगितलेलें, ऐकलेलें सर्व नाहींसें होतें.

करितां स्मरणांत खंड पडूं न देतां आत्म्याचें चिंतन व दर्शन करीत राहिल्यास सर्व कांहीं हस्तगत होऊन 'स्वस्थता' प्राप्त होईल.

'स्व' म्हणजे **स्वरूप**, 'स्थ' म्हणजे **स्थिरपणा**. स्वरूपी स्थिर झाल्यास सगळीकडे स्वस्थताच स्वस्थता.

नेणीव सोडून जाणीव जोडून निर्गुणांत राहिल्यास, इहलोकीं कोणतीही बाधा न होतां, खरीखुरी मुक्ति मिळते. या कारणानें एक क्षण देखील **'व्यर्थ'** न दवडितां, अखंड ध्यानामध्यें असावें. सत्य असलेला, **'अर्थ'**च स्वरूप–आत्मा–होय. त्या विरहित–त्याला न पहातां–त्यांचें स्मरण न करतां केलेलें सर्व **'व्यर्थ'** होय. फलहीन होय.

(५२) सत्संगाची व्याख्या.

सत्संग म्हणजे सज्जनांचा संग, आपल्या-

पेक्षां श्रेष्ठ – उत्तम गुणांच्या लोकांचा संग. सद्गुरूंनीं दिलेल्या नामाचें स्मरणही सत्संगच. तें निरंतर श्वासांत ओवणें हाही सत्संगच. सद्वस्तूचें अनुसंधान – सतत प्रचीती – हाही सत्संगच होय.

सदैव निर्गुणाची संगत असावी. म्हणजे तो ' अच्युत ' होऊन पार होतो. आपण अच्युताची संगती धरली तर आपणाला अच्युतपणा प्राप्त होतो.

(९३) दिवसरात्रीं मिळूनच आत्मध्यान.

सद्गुरुरायांनीं दिलेलें नाम उठतां बसतां सारखें स्मरून, या डोळयांनीं आत्मप्रकाश पहात असावें.

कोणत्याही विकारांत मन गुंतलें तरी पुनः पुनः नामस्मरणच करावें. सर्व गोष्टींत नामच आपणास तारतें. म्हणून आत्मध्यानाव्यतिरिक्त अन्य कामांत केव्हांही आयुष्य वेचूं नये. आपण जन्माला येऊन करावयाचें मुख्य काम म्हणजे आत्मध्यान हेंच होय.

आत्म्याचें ध्यान केव्हांही सोडूं नये. दिवसा-रात्रीं मिळूनच करावें. प्रतिदिवशीं एकेक तासाप्रमाणें तीन वेळां, अगर दिवसा दोन तास व रात्रीं दोन तास याप्रमाणें नामस्मरण करत बसावें.

साधन न कंटाळता – सदैव – गुप्त रीतीनें करावें. दुसऱ्यांना कळूं न देतां दिवसारात्रीं मिळून ध्यानांत असावें. गौप्य कळूं देऊं नये.

(५४) देहस्वभाव सोडून साधन करावें.

मजूरीनें दळणारें पहाटें न सुटणारें कर्म म्हणून जुलमानें उठतात. तसेंच समजून आपण उठून साधन करावें. शरीर नको म्हणते. कारण त्याचा स्वभाव पुनः जन्माला येण्याचा आहे. परंतु त्यांचें सांगणें ऐकूं नये. त्यास त्रास देऊन त्याची गोष्ट मोडून आपण उठावें.

जन्माला आल्याचा मुख्य उद्देश – साधन करणें हाच आहे. म्हणून देहस्वभाव सोडून साधन करावें.

(५५) कल्पनेचा त्याग.

साधनाच्या वेळीं मनांत कोणतीही कल्पना येऊं देऊं नये. आली तर तिला घालवून टाकावें.

सर्व कांहीं देणारा, नेणारा, आपलें रक्षण करणारा आत्मा असल्यानें, त्याला विसरून, आपल्या मनास येईल तसें वाईट रीतीनें वागून, कल्पना केल्यास ती केव्हांही सिद्धीस जाणार नाहीं.

त्या कारणानें देवाच्या मनांस येईल त्याप्रमाणें होवो असा विचार करून कल्पना टाकून द्यावी. कल्पनेचें बीजच नाहींसें करावें. कल्पना सोडून साधन करीत असावें.

निर्विकल्पाची कल्पना केल्यास सर्व कल्पनांचा नाश होईल.

(५६) आत्मा माणसाची पारख करतो.

वडील माणसें मुलांची परीक्षा करण्या-

करितां आपणच त्यांच्या हातीं एकादी वस्तू देऊन पुनः ती मागतात. मुलें ती देण्यास तयार झालीं तर हा गुण पाहून त्यांना संतोष होतो. ती त्यांना हवी असत नाहीं अगर ते ती घेतही नाहींत. त्याचप्रमाणें आत्मा आपली पारख करण्यास आपल्यावर कांहीं प्रसंग आणतो. गुणांचा त्याग करणें हें आपल्याला पाहिजे असतें. त्यास आपण तयार झालो म्हणजे तो अंत पहात नाहीं. एकेक गुणाचा त्याग करून आपण त्याची चाकरी करण्यास तयार झालों म्हणजे त्याला संतोष होऊन तो आपणावर प्रेम करतो.

(५७) जशास तसें-पेऱ्याप्रमाणें पीक.

आत्मा आपण केलेलें कांहींही ठेवून घेत

नाहीं. आपण जसें करावें तसें तो 'जशास तसें अगर पेरल्याप्रमाणें पीक' या न्यायानें आपल्यास सर्व देतो. ते आपणास घ्यावें लागतें.

आत्म्याच्या राज्यांत सर्व कांहीं तोलून होतें. जास्त कमी कांहींही होत नाहीं. आपण अंतःकरणपूर्वक केलें तर आत्माही आपणास अंतःकरणपूर्वक करतो. उपचारास उपचार, कंटाळचास कंटाळा, निष्ठुरपणास निष्ठुरपणा —असें तो करतो.

(५८) आत्म्याची चाकरी हाच मुख्य धर्म.

आपण आपल्यांत असलेल्या आत्म्याची चाकरी करण्यास तयार असावें. त्याच्या

आज्ञेखेरीज आपल्या मनाचे ऐकून ते सांगेल तसें नाचूं नये.

आत्मा आपला मालक. आपण त्याचा चाकर असें समजावें. एखादा इसम मजूरी करून, यजमानांच्या सांगण्याप्रमाणें त्याच्या आज्ञेंत संध्याकाळपर्यंत वागल्यास, त्याला दोन आणे, मजूरीदाखल दिले जातात. परंतु सकळाठायीं असलेला परमात्मा-अनंतहस्त-सर्वांपूर्वी असलेला आदिदेव-त्याच्या सांगण्या-प्रमाणें वागून त्याच्या आज्ञेंत असले तर तो आपल्या संसारांत कशाचीही उणीव पडूं देणार नाहीं.

निरंतर त्याचीच प्रतिक्षा करून त्यांच्याच ध्यानांत मग्न होऊन आत्म्याला वाढवीत

असावें. याप्रमाणें उत्तम चालीनें चालून त्याची चाकरी करून, भाकरी मागत असावें. **आत्म्याची चाकरी करणें हाच आपला मुख्य धर्म – हाच स्वधर्म** – हेंच पुण्य होय.

काया-वाचा-मनानें कोणतेंही काम केल्यास तें आत्म्याला सोडून करूं नयें. नेहमी त्याला पहात – त्याचें स्मरण करीत – कोणतेंही काम करावें.

लौकिकाकरितां कांहींही न करणें, आत्म्याकरितांच सर्व कांहीं करणें. हाच आपला मुख्य आचार.

(५९) सर्व कामांत आत्म्यालाच पुढें करावें.

ध्यान करून पाहिलेला दिव्य प्रकाशच

आत्मा होय. सर्व कामीं त्यालाच पुढें करावें. म्हणजे त्या कामास यश येतें.

परंतु ज्या कामांत आत्मा आडवा येतो, तें काम करूं नये. केल्यास होणार नाहीं. आत्मा आपल्या समोर असतो. तो किंचित बाजूला झाला तर, तोच अडथळा असें समजून आपण त्या कामास जाऊं नये.

एखाद्या कामांत आत्म्याची खूण दिसून आल्यास तें काम आत्म्याच्या इच्छेप्रमाणें निश्चितपणें होतें.

(६०) आत्म्याचा साक्षात्कार.

आपला संसार आत्म्याला सोपवून (अर्पून) आपण त्याच्या ध्यानाव्यतिरिक्त असूं नये.

सर्व कांहीं आत्म्याच्या स्वाधीन आहे. त्याच्याखेरीज कांहींही होत नाहीं. म्हणून निरंतर साधनानें त्याचें प्रेम मिळवीत जावें. आत्म्याची प्रभा पहात असावें. याच्याकरतांच देवानें डोळे दिले आहेत.

कदाचित् फार दिसली नाहीं तरी (हरकत नाहीं) 'देखे खसखस मुरीद मरे तो बसबस' असें मुसलमानी शास्त्रांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें 'घ्यारे अच्छेर पावशेर धडा। जितुके लागेल तितुके जोडा। असें श्री तुकाराम महाराजांनीं सांगितलें आहे. याचप्रमाणें कन्नड भाषेमध्यें देखील "खूण पाहिलीस तर पुनः भवास येणार नाहींस"–(कुरुहु कंडरे मरलि भवक्के बरलारि) असें सांगितलें गेले आहे.

म्हणजे पुढें त्यांना (परमात्म्याची अल्प खूण पाहिलेल्यांना) संतति-संपत्ति प्राप्त होऊन, ते सुखी राहून, त्यांनीं आत्म्याचा प्रकाश वाढवल्या कारणानें - ज्योतिरूप पाहिल्या कारणानें, ते या जन्मींच मुक्त होऊन आत्म्यांत मिळून जातात, ऐक्य पावतात, यांत शंका नाहीं.

पद १ लें.

सद्गुरुच्या चरणकमलिं । भृंग होई रे ।।ध्रु.।।
अस्थिर संसारी या । नरजन्मा येउनिया ।
परतत्त्वा जाणुनिया । सत्संगीं राहि रे ।।१।।
मौने मुद्रा वाढवुनी । ज्ञानज्योतिमधे रंगुनि ।
स्वानुभवामृत सेवुनि । निस्संग होइ रे ।।२।।
मुप्पिन मुनि-कथित-वचन । नीलकंठ काडसिद्ध ।
वसत जेथ तेथ जावुन । वंदि त्यासि रे ।।३।।

पद २ रें.

ॐ नाम तारील । नामाचें बल हे ।।ध्रु०।।
प्रल्हादा तारक पावन नाम ।
अजामिळासी बलदायक नाम ।।
सुरवृन्दा संतोष-कारक नाम ।
द्रौपदी–अभिमान–रक्षक नाम ।।१।।

पक्षीसुतातें रक्षक नाम ।
पार्थपणा यशदायक नाम ॥
पराशरादिका सहायक नाम ।
पन्नग शयनाचें परिपूर्ण नाम ॥२॥

करिराज–रक्षक कृपापूर्ण नाम ।
बालाचे (ध्रुव) शोक शोकनिवारक नाम ॥
भवाचे बंधन–छेदक नाम ।
गुरु-लिंग-जंगमाचे पुण्य नाम ॥३॥

पद ३ रें.

दुखवूनि बोलिला का । श्री बलभीमा ॥
दुखवूनि बोलिला । दोष म्या काय केला ।
क्लेश नाश करी । ब्रीद–पालक देवा ॥ध्रु॥

दासानुदास तुझा । केशवस्वामी ।
करुणेनें रक्षी मज ॥
कांहीं कारण नसुनि मजसी । शब्द-शस्त्रे ताडियेले ॥
सूक्ष्म न्याय करी । पक्षीवाहन देवा ॥१॥
फत्तरी लपलासी का करुणाकरा ।
ब्रीदासी मुकलासी का ॥
अल्लम प्रभुदेव आपुल्या । सन्निधचि मी राहतो ना ।
शिला भेदुनि नारसिंहा । प्रकट होई देवा ॥२॥
धरणीवरि धन्य अशा । निंबरगी ग्रामी ।
वसणाऱ्या भीम-राया ।
गुरु-लिंग-जंगम । चिन्मय रूपी तू ॥
तनु मन-धन तव चरणी अर्पित देवा ॥३॥

पद ४ थें.

इतुके दिन हे चार वेद ।
वेगवेगळें भावित होतो ।। ध्रु. ।।
सुंदरूंच्या प्रसादे करूनि ।
सर्व शास्त्रैक्य म्या जाणितले ।। १ ।।

गिरिजा गंगा रुद्र हरीची ।
व्रते भिन्नचि मानितं होतो ।
सार्वभौमांते सुज्ञान होता ।
सकल व्रतमय मी झालो होतो ।।२ ।।

सप्त-स्वर्ग-भू-पाताल ।
सुरगण भिन्न लेखित होतो ।
सर्वशांताते सुज्ञान होता ।
गुरुलिंगजंगम मी झालो होतो ।। ३ ।।

पद ५ वें.

चित्ताची मुरड ही चुरडीगा देवा ॥ ध्रु ॥
प्रभातापासून परद्रव्य अपहार ।
साधूंची निंदाचि करीतसे ।
साधून (संधि) यमदूत ओढून नेतांना
मेलो मेलो ऐसे ओरडतसे ॥ १ ॥
यतिवेष घालुनि स्वदेश टाकूनि ।
काशी यात्रेपायी निघते हे मन ।
परी मार्गी चालता वेश्येसी भाळून ।
केशवा! आपणा विसरले मन ॥ २ ॥
धनिकांना पाहून आर्जव करीतसे ।
गरीबांना टाकून बोलतसे ॥
गुरुलिंग-जंगम-चरणीं रत न होता ।
रानीं-वनीं नित्य भटकतसे ॥३॥

पद ६ वें.

चिंता का बा करिशी । शिव तो आहे ना रे
प्राण्या ॥ध्रु०॥

उदकी उत्पत्ति करितो कवण ।
उदरांतील शिशु पाळितो कवण ॥
तुज पालन-पोषण केलेला, आहे ना प्राण्या ॥१॥

मागे तुजला तारी कवण ।
पुढे तुजला मारी कवण ॥
तेव्हां-एव्हां-केव्हांही शिव आहे ना रे
प्राण्या ॥२॥

अंतरी अंबर ठेवी कवण ।
रवि-शशि मार्ग चालवि कवण ॥
गुरुलिंगजंगम सर्वेश असा आहे ना रे
प्राण्या ॥३॥

पद ७ वें.

हृदय-उपला (दगडा) मृदु करी राया ।
ज्ञात्यासि पुसुनी ।।
उपल जरि कोमलचि होई । साखरेहुन गोड पाही ।
सार अमृत पिउनि पिऊनि । ज्ञानज्योति भरुनि घेई ।।ध्रु०।।
उपला-अंतरि परीस पाहा गा । पर (ब्रह्म) जाणल्याविण ।
कैसा तो तव हातीं येईल गा ।।
उपल-भेदक अल्लमप्रभु । उपल भेदुनि उदक मिळवी ।
उदक उदकीं लीन होता । भिन्नभावचि छिन्न होई ।।१।।

कल्पतरु हा उपल पाहा गा । कामीत सुफळें ।
देणें त्याचें ब्रीद आहे गा ॥
गुरु-लिंग-जंगम चरणीं । सर्वभावे लीन होई ।
गूळ-गोडी मिळत जेवी । तेवि तूही विरुनि
जाई ॥२॥

पद ८ वें.

कैसा मी धनहीन । कैसा मी परदेशी ।
तू मज-समचि असता ॥
तुजला क्षय नाहीं । मजला भय नाहीं ।
वाहवारे मम स्वामी । बिजरूप तूची
॥ध्रु०॥

मज सवे जन्मुनि । मज अन्न पुरवीसी ।
मम माता-पिता-बंधु तूचि होसी ॥

तुजसम प्रभुवर । मज दाता असताना ।
वांछित फळल्यास आश्चर्य काय ? ॥ १॥

पुढती उभा तूचि । मागे उभा तूचि ।
वामसव्य–रक्षण–कर्ता तूचि ॥
गुरुलिंगजंगमाची खूण ज्या लाधली ।
धनवंत तयासी करतील काय ? ॥२॥

पद ९ वें.

साळी सडू ये गडे । दोघी मिळुनि ॥
साळी सडू येग । हातोहाती पाठपुरवुनि ।
बारा-सोळा-जणी झणी । सुवासीनी मेळवोनी ॥ध्रु०॥

तनुरूपी उखळामध्यें । प्रणवरूपी ।
मुसळानें कांडोनिया ॥

विवेकाचे तांदूळ । निपुणत्वें निवडोनि ।
ज्ञानदृष्टीनें सर्व । कसर काडी बाई ॥१॥
वासनात्रय-वीटांच्या । चुलीवरती ।
प्रारब्ध-पात्र ठेवी ।
कामक्रोधरूपी । काष्टे जाळूनिया ।
प्रपंच-परमार्थ । आंत-बाहेर पाहे बाई ॥२॥
अन्न शिजत असतां । मदाचा तो ।
भारीं ऊत येई ।
सत्त्व-धैर्य-रूपी । डावानें ढवळून ।
नित्य तू स्वयपाक । नीट करी बाई ॥३॥
परमान्न खीर जेव्हां । प्रारब्धानें ।
तुजला ती प्राप्त होई ॥
गुरु-लिंग-जंगम । व्याह्याना मिळवोनि ।
स्वानंद भोजनाची । गोडी चाख बाई ॥४॥

पद १० वें.

तेव्हा नाहीं । स्वामी । एंव्हा नाहीं ।
केंव्हाही आपणा सोडूनि मी नाहीं ॥धृ॥
निराकार तुम्हीं । निर्विकार आम्हीं ।
सगुणरूप तुम्हीं । नमन करतो आम्हीं ॥१॥
पंचवदन तुम्हीं । चरणीं शरण आम्हीं ।
विश्वभरित तुम्हीं । विश्वोदरी आम्ही ॥२॥
प्रणवरूप तुम्हीं । स्मरण करितो आम्ही ॥
गुरुलिंगजंगम तुम्ही । मीही तुम्हींच स्वामी ॥३॥

श्रीगणपति सं. प्रेस, सांगली.